दैनिक
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper. lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२५१ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, गुरुवार, २२ फेब्रुवारी २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

गावे समाविष्ट करण्याच्या नव्या निर्णयाला नव्याने आव्हान द्या, विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांना उच्च न्यायालयाची सूचना

ठाणे, विशाल कारंडे :
वसई-विरार महापालिकेच्या पश्चिम पट्ट्यातील हद्दीतील २९ गावांबाबत राज्य सरकारने नुकत्याच काढलेल्या अधिसूचनेला नव्याने आव्हान द्या, अशी सूचना उच्च न्यायालयाने मंगळवारी निर्णयाला विरोध असलेल्या याचिकाकर्त्यांना केली. वसई-विरार महापालिकेच्या हद्दीतून २९ गावे वगळण्याच्या राज्य सरकारच्या २०११ मधील अधिसूचनेला विविध याचिकाकर्त्यांनी आव्हान दिले होते. तर हस्तक्षेप याचिका करून काहींनी याचिकाकर्त्यांच्या मागणीला विरोध केला होता. या याचिकांवर न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी सुनावणी झाली. त्यावेळी, वसई-विरार महापालिकेत संबंधित २९ गावे समाविष्ट राहतील याबाहतची नवी अधिसूचना सरकारने काढल्याची माहिती सरकारी वकिलांनी न्यायालयाला दिली. त्याची दखल घेऊन न्यायालयाने आधीच्या अधिसूचनेला आव्हान देणाऱ्या याचिका निकाली काढण्याचे स्पष्ट केले. तसेच, गावे समाविष्टकरण्याला विरोध असणाऱ्या याचिकाकर्त्यांनी सरकारच्या निर्णयाला नव्या याचिकेद्वारे आव्हान देण्याचे स्पष्ट केले. त्याचवेळी, याचिका निकाली काढण्याबाबतचा आदेश गुरुवारी देणार असल्याचेही स्पष्ट केले. वसई-विरार पालिकेतून २९ गावे वगळण्याचा प्रश्न मागील दहा वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहे.

विधानसभा अध्यक्षांसह शरद पवार गटाच्या १० आमदारांना उच्च न्यायालयाची नोटीस

मुंबई, यश सावंत :
राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या १० आमदारांना पात्र ठरवण्याच्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा निर्णय कायद्याला धरून नाही, असा दावा करून या निर्णयाला आव्हान देणाऱ्या राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाच्या याचिकेची उच्च न्यायालयाने बुधवारी दखल घेतली. तसेच, विधानसभा अध्यक्षांसह शरद पवार गटाच्या १० आमदारांना नोटीस बजावून याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. अजित पवार गटाचे मुख्य प्रतोद अनिल पाटील यांनी विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाविरोधात याचिका केली असून शरद पवार गटाच्या आमदारांना अपात्र घोषित करण्याची मुख्य मागणी याचिकेद्वारे केली आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि

न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या खंडपीठासमोर अजित पवार गटाच्या याचिका बुधवारी सुनावणीसाठी आल्या. त्यावेळी, न्यायालयाने अजित पवार गटाचे म्हणणे थोडक्यात ऐकल्यानंतर विधानसभा अध्यक्षांसह शरद पवार गटाच्या आमदारांना नोटीस बजावली व याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. तत्पूर्वी, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाचा राष्ट्रवादी काँग्रेसवर हक्क आहे. तो त्यांच्याच गटाचा पक्ष आहे, असा निर्णय दिल्यानंतर शरद पवार गटाच्या आमदारांना अपात्र ठरवण्याच्या मागणीसाठी आपल्या गटाने केलेल्या याचिकाही अध्यक्षांनी मान्य करायला हव्या होत्या. मात्र, दोन्ही गटातील आमदारांना पात्र घोषित करण्याच्या अध्यक्षांच्या निर्णयामुळे पक्षातील फूट हा पक्षांतर्गत मतभेद असल्याचा चुकीचा निष्कर्ष काढला, असा दावा अजित पवार गटाकडून न्यायालयात करण्यात आला. दरम्यान, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १५ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवार गटाचा असल्याचा निकाल जाहीर करतानाच दोन्ही गटाच्या आमदारांना पात्र ठरवले होते. शरद पवार यांनी १९९९ मध्ये राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केली होती. मात्र, गेल्यावर्षी जुलै महिन्यात अजित पवार यांच्यासह आठ आमदारांनी बंड केले व सत्ताधारी भाजप-शिवसेना सरकारमध्ये सहभागी झाले. त्यानंतर, दोन्ही गटामध्ये फूट पडली व पक्ष कोणाचा या प्रश्नाचा वाद अध्यक्षांकडे गेला. तेथे एकमेकांच्या आमदारांना राज्यघटनेच्या दहाव्या अनुसूचीच्या कलम २(१)(अ) अंतर्गत अपात्र ठरवण्याची मागणी दोन्ही गटांनी केली.

'विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्याला ड्रग्जचा विळखा; ड्रग माफियांना कुणाचा आशीर्वाद?' - विजय वडेट्टीवार

पुणे,अभिजित येरल्लू :
राज्यात गेल्या १५ दिवसांत अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याचे दिसून आले. त्यातील बरेच गुन्हे हे पुणे आणि आसपासच्या परिसरातील आहेत. विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात 2200 कोटींचे ड्रग्ज सापडले. सरकारच्या नाकर्तेपणामुळे पुण्याला ड्रग्जचा विळखा पडला आहे. महायुती सरकारच्या काळात ड्रग माफियांचा सुळसुळाट वाढला असून सरकारची डोळेझाक कशासाठी; ड्रग माफियांना कुणाचा आशीर्वाद आहे?, असा संतप्त सवाल विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. पुणे पोलिसांच्या इतिहासातील सगळ्यात मोठी कारवाई मागील दोन दिवसांत झाली आहे. पुणे पोलिसांनी पुण्यातून जवळपास 2200 कोटींचे ड्रग्ज

जप्त केले आहे. पुणे पोलिसांनी पुणे, विश्रांतवाडी, कुरकुंभ, दौंड आणि राजधानी दिल्लीमध्ये कारवाई केली. पण पुण्यातील ड्रग्जची व्याप्ती आणखी मोठी असल्याचे बोलले जात आहे. तरीही सरकार ड्रगच्या समूळ उच्चाटनासाठी धडक कारवाई करत नाही. सरकार डोळेझाक करत आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. राज्यातील तरुणाईला वाचविण्यासाठी ड्रग माफियांचा सरकारने वेळीच बंदोबस्त केला पाहिजे. सरकारने धडक कारवाई करून जरब बसविली पाहिजे.

बोर्डाच्या परीक्षेच्या तोंडावर वाहतूक कोंडीचा त्रास, जागोजागी सुरु असलेल्या खोदकामामुळे नागरिक त्रस्त

भाईंदर, रोहित जसवाल :
मिरा रोड व भाईंदर शहरात सध्या सिमेंट रस्ते उभारणी व इतर विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम केले जात आहे. यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीची समस्या जाणवत आहे. तर यांचा गंभीर फटका आता बोर्डाच्या परीक्षेला जाणाऱ्या बारावीच्या विद्यार्थांना सहन करावा लागणार आहे. मागील तीन वर्षांपासून मिरा भाईंदर शहरातील मुख्य मार्गांवर मेट्रो मार्गीका उभारण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे या मार्गांवरून प्रवास करताना नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. यावर उपाय म्हणून अनेक वाहनचालक हे प्रवासासाठी अंतर्गत रस्त्याचा वापर करू लागले आहेत. याने काहीश्या अंशी वाहतूक कोंडीची समस्या कमी झाली आहे. परंतु आता पुन्हा शहरातील बहुतांश अंतर्गत रस्त्यावर सिमेंट रस्त्याची उभारणी, महानगर गॅस वाहनी आणि विद्युत वाहिनी टाकण्याचे काम केले जात आहे. परिणामी या रस्त्यांवर देखील खोदकाम केले जात असून वाहतुकीसाठी केवळ अरुंद रस्ता शिल्लक राहिला आहे. याचा मोठा परिणाम हा शहराच्या संपूर्ण वाहतूक व्यवस्थेवर होत आहे.

यात दुपारी शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत वाहनांना मार्ग काढने कठीण होत आहे. त्यामुळे कित्येकदा लहानसे अंतर गाठण्यासाठी शालेय बस गाड्यांचा २० ते २५ मिनिटांचा वेळ वाया जात आहे. अशा परिस्थितीत उद्यापासून सुरु होणाऱ्या बारावी बोर्डाच्या विद्यार्थांना परीक्षा केंद्रावर जाणाऱ्या प्रवाशाचे नियोजन करणे कठीण होणार आहे. त्यात एखादा विद्यार्थी वाहतूक कोंडीत अडकून परीक्षेला उशिरा पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेने तसेच वाहतूक विभागाने याकडे गांभीयार्ने लक्ष देण्याची मागणी शिवसेना १४६ विधानसभा अध्यक्ष सचिन मांजरेकर यांनी केली आहे.

नवी मुंबईत अधिकारी गेले अतिक्रमण हटवण्यास अन सापडला २० किलो गांजा, एकाला अटक

नवी मुंबई, भावना जैन :
नवी मुंबईतील कोपरखैरणे स्टेशन नजीक बुधवारी मनपाने अतिक्रमण विरोधी कारवाई करीत ३० पेक्षा अधिक झोपड्या काढून टाकल्या. या कारवाईत होणारा विरोध लक्षात घेत मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्तही लावण्यात आला होता. मात्र मनपाची कारवाई अचानक थांबवावी लागली आणि पोलीस कारवाई सुरु झाली. याला कारण होते ते अतिक्रमण हटवताना एका मागे एक गांजाच्या पिशव्या सापडू लागल्या .नवी मुंबईतील कोपरखैरणे स्टेशन नजीक आणि बालाजी चित्रपट गृहासमोर असलेल्या झोपडपट्ट्या काढून टाकण्यासाठी अतिक्रमण पथकाने आज कारवाई केली. हि कारवाई सुरु असताना झोपडीत राहणाऱ्यांनी, व्यवसायिकांनी मोठ्या प्रमाणात विरोध केला. हा विरोध अपेक्षित असल्याने पोलीस बंदोबस्त हि ठेवण्यात आला होता. मात्र कारवाई करत असताना हळूहळू विरोध मावळू लागला आणि शिस्तीत कारवाई सुरु झाली. दरम्यान एका ठिकाणी झोपडी पाडू नये म्हणून एक व्यक्ती कमालीचा विरोध करत होती. पोलिसांनीही त्या व्यक्तिला समजावून सांगितले. मात्र त्याचा विरोध प्रखर होताना पाहून पोलिसांना संशय आला. पोलिसांनी काही वेळासाठी कारवाई थांबवली व त्या व्यक्तीला पकडून झोपडीची झडती घेतली असता गांजाच्या छोट्या मोठ्या पिशव्या सापडू लागल्या.

शरद पवार कोल्हापूरच्या दौऱ्यावर, पत्रकार परिषदेत शरद पवारांचं भाजपच्या 'त्या' रणनीतीवर बोट

कोल्हापूर, सचिन कदम :
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार कोल्हापूरच्या दौऱ्यावर आहेत. कोल्हापूरमध्ये बुधवारी त्यांनी पत्रकारांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी इंडिया आघाडी, महाविकास आघाडी, चंदीगड महापौर निवडणूक प्रकरण, राष्ट्रवादी काँग्रेसबाबतचा निवडणूक आयोगाचा निर्णय, कांदाबंदी यासंदर्भात भाष्य केलं. इंडिया आघाडीतील काही घटकपक्षांमध्ये वाद आहेत. वेगवेगळे पक्ष एकत्र येत आहेत. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगालमध्ये अडचणी आहेत. पश्चिम बंगालमधील पक्ष पारंपरिकपणे एकमेकांच्या विरोधात आहेत. वरिष्ठ नेत्यांनी एकत्र बसून हे प्रश्न

सोडवण्यासाठी प्रयत्न करतोय, असं शरद पवार म्हणाले. इंडिया आघाडीच्या बैठकीत काँग्रेसच्या वतीनं मल्लिकार्जून खरगे सहभागी होतात. महाराष्ट्रातील जागावाटपच्या चर्चेत मी नसतो. जयंत पाटील, नाना पटोले आणि संजय राऊत एकत्र बसून चर्चा करतात. गुरुवारी त्यांची बैठक होत आहे,अस शरद पवार म्हणाले. महाराष्ट्रात मविआची बैठक गुरुवारी होत आहे, चर्चा होईल दोन तीन दिवसात काय होतू ते पाहू, असं त्यांनी म्हटलं. अशोक चव्हाणांचा निर्णय सर्वांसाठी आश्चर्यकारक होता. पण, मला तो आश्चर्यकारक वाटत नाही. भाजपनं एक श्वेतपत्रिका काढली होती,त्यात आदर्श प्रकरण आणि अशोक चव्हाण यांचं नाव होतं. मला वाटलं तो धमकावण्याचा प्रकार होता आणि त्याचा परिणाम होता, असं शरद पवार म्हणाले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि ठाकरेंची शिवसेना आम्ही एकत्र बसतो काम करतो याचा अर्थ विलीनीकरण नाही, असं शरद पवारांनी स्पष्ट केलं. चंदीगडमध्ये आप, भाजप आणि काँग्रेस यापैकी कुणाला बहुमत नव्हतं. निवडणूक आयोगानं ज्यांच्यावर जबाबदारी सोपवली त्यांनी आप काँग्रेसची आठ मतं बाद केली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांचा 'दांडपट्टा' 'राज्यशस्त्र' म्हणून घोषित

चंद्रपूर, नितीन देवळेकर :
ज्या किल्ल्यावरून क्रूर, अत्याचारी, जुलमी औरंगजेबाने छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्याचे स्वप्न उधळून टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला, त्याच आग्रा येथील किल्ल्याच्या दिवाण-ए-खासमधून महाराजांच्या आणि मावळ्यांच्या पराक्रमाचे प्रतिक असलेला दांडपट्टा 'राज्यशस्त्र' म्हणून घोषित करण्यात आला. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ही घोषणा करताना अभिमानाने उर भरून येत असल्याची भावना व्यक्त केली.

आग्रा येथील किल्ल्यामध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'हर हर महादेव'चा जयघोष करीत अतिशय दिमाखात शिवजयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री एस. पी. बघेल, खासदार, श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, दिग्दर्शक प्रवीण तरडे, अभिनेते मंगेश देसाई, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, विनोद पाटील, विद्याधर पवार, आस्तिक पांडे, गायक नितीन सरकटे आदी मान्यवर उपस्थित होते. छत्रपती शिवराय आणि त्यांच्या मावळ्यांच्या पराक्रमाचा गौरव करण्यासाठी दांडपट्टा या शस्त्राला 'राज्यशस्त्र' म्हणून मान्यता देण्यात येत असल्याचे ना. मुनगंटीवार यांनी सांगितले. यावेळी दांडपट्टा पूजनही करण्यात आले. ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज रयतेचे राज्य स्थापन करण्यासाठी आयुष्यभर जगले.

'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेत पनवेल महापालिकेने बाजी मारली

पनवेल, विशाल पाटील :
मराठी माध्यमाचे शिक्षण देणाऱ्या पनवेल महानगरपालिकेच्या दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील प्राथमिक शाळेने तालुक्यातील २४० शाळांना स्पर्धेत मागे टाकत पहिला क्रमांक पटकाविला आहे. शासनाने राबविलेल्या शिक्षण व्यवस्थेमधील उपक्रम कोणती शाळा अचूक राबविते यासाठी केंद्र स्तरापासून ते राज्य स्तरापर्यंत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा ही स्पर्धा घेण्यात आली. विविध उपक्रमांची माहिती संकलित करुन शासनाच्या स्वच्छता मॉनिटर या ॲपवर ही माहिती दिल्यानंतर पालिकेच्या शाळेने तालुक्यात पहिला क्रमांक पटकावला. या स्पधेर्चा पुढील टप्पा हा जिल्हास्तरीय असून त्यानंतर राज्य स्तरीय स्पधेर्साठी पनवेलची

शाळा निवडली जाईल का यासाठी पालिकेचे प्रयत्न सूरु आहेत.

राज्याच्या शिक्षण विभागाने केंद्र स्तरावर, तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर ह्यसुंदर शाळेह्नची स्पर्धा आयोजित केली आहे. तीन दिवसांपूर्वी शासनाच्या शिक्षण विभागाच्या निरिक्षकांनी पनवेल शहरातील महापालिकेच्या शाळा क्रमांक १ दिवगंत लोकनेते दि. बा. पाटील शाळेला भेट दिली. पाच एकर भूखंडावर तीन मजली इमारतीसाठी पनवेल महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांनी १२ कोटी रुपये खर्च करुन ही शाळा बांधली आहे. शाळेचा परिसरात मोठा असल्याने येथे विविध उपक्रम राबविणे शिक्षक व विद्यार्थ्यांना शक्य होते. या शाळेत ३१३ विद्यार्थी पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण घेतात. ३० हून अधिक वर्गखोल्या या शाळेच्या इमारतीमध्ये आहेत. आठ शिक्षकांनी शाळेची अचूक माहिती शासनाच्या स्वच्छता मॉनिटर या ॲपवर लिहीली.

शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांनी केलेली स्वच्छतेची माहिती समाजमाध्यमांवर दर्शविली गेली. वर्गांची सजावट, पोषण आहाराअंतर्गत परसबागेतील फळबागेतील माहिती, वक्तृत्व स्पधेर्सारख्य विविध स्पर्धेच्या उपक्रमाची माहिती शिक्षकांनी मॉनिटर ॲपमध्ये अचूक दिल्याने तसेच शाळेतील सुशोभिकरण, विद्यार्थ्यांकडून शिक्षकांनी करुन घेतलेल्या उपक्रमांमुळे ही निवड झाली. आयुक्त देशमुख यांनी दिलेल्या माहितीनूसार पालिकेच्या शिक्षण विभागाचे काम पालिकेचे अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त गणेश शेटे, प्रशासन अधिकारी किर्ती महाजन, मुख्याध्यापिका अनुपमा डामरे, सरीता काकडे, विनिता तायडे, वैशाली सावळे, निलम देवळे, अर्चना माने, चंद्रकांत वारघुडे, जयश्री रोढे, वैशाली पाटील हे पाहत आहेत.

मुंबई बंदरावरचे अतिक्रमण रोखणार 'रक्षक', प्राधिकरणाच्या भूखंडावरील प्रत्येक यार्डासाठी नेमणूक

मुंबई, दिगंबर जाधव :
मुंबई बंदर प्राधिकरणाची जमीन मुंबईभर पसरली आहे. त्यातील अनेक जमिनींवर अतिक्रमण झाले आहे. मात्र यापुढे अतिक्रमण होऊ नये यासाठी प्राधिकरणाने तयारी केली आहे. याअंतर्गत भूखंड, जमिनींसह प्राधिकरणाच्या विविध यार्डसाठी स्वतंत्र रक्षकांची नेमणूक होणार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झालेले बॉम्बे बंदर पुढे बॉम्बे पोर्ट ट्रस्ट झाले व त्याचे नामकरण आता केंद्र सरकारने मुंबई बंदर प्राधिकरण (एमबीपीए) म्हणून केले आहे. या बंदराकडे १ लाख चौरस मीटरहून अधिक क्षेत्रफळाची जागा आहे. त्यापैकी जवळपास ४० हजार चौरस मीटरचा भाग हा समुद्रातील बोटी येणे-जाणे करण्यासाठीचा आहे. उर्वरित भाग हा प्रत्यक्ष बंदराचा आहे. बंदरावर ६३ जहाजे उभी करण्याच्या जागा व पाच मोठे धक्के आहेत. याखेरीज मोठ्या जहाजांसाठी खोल समुद्रात ६९ नांगरणीच्या जागा आहेत. प्राधिकरणाकडे प्रत्यक्षात ९४४ हेक्टर जमीन असून ३०० हेक्टर जमिनींवर कर्मचाऱ्यांसाठी रहिवासी वसाहत, कार्यालयीन जागा, अन्य सरकारी विभागांना भाडेतत्त्वावर दिलेल्या जागा यांचा समावेश आहे.या सर्व जागांच्या सुरक्षेसाठी आता प्राधिकरणाकडून स्वतंत्र रक्षक नेमण्याची तयारी सुरू आहे. यासंबंधी मुंबई बंदर प्राधिकरणाने निविदा काढली आहे.

शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे सरकारची मोठी कारवाई, 170 हून अधिक सोशल मीडिया अकाउंट्स ब्लॉक

नवी दिल्ली, प्रगती शर्मा:
केंद्र सरकार आणि शेतकरी नेते यांच्यात झालेली बैठक निष्फळ ठरली आहे. शेतकऱ्यांनी दिल्लीकडे आगेकूच करण्याचा निर्णय घेतला आहे. जाब-हरियाणाच्या शंभू बॉर्डरवर बुधवारी 21 फेब्रुवारीला सकाळी दिल्लीच्या दिशेने शेतकरी पुढे सरकू लागले आहेत. आमच्या मागण्या लवकर मान्य करा अन्यथा दिल्लीत येऊन चक्काजाम करू, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने जवळपास 177 सोशल मीडिया अकाऊंट्स आणि वेबसाइट्स काही काळासाठी बंद केली आहेत. पीटीआयच्या वृत्तानुसार, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने 14 आणि 19 फेब्रुवारी रोजी हे आदेश जारी केले होते. गृह मंत्रालयाच्या विनंतीवरून आयटी कायद्याच्या कलम 69अ अंतर्गत ही अकाऊंट्स आणि वेबसाइट्स ब्लॉक करण्यात आली आहेत. रिपोर्टनुसार, गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार, कायदा आणि सुव्यवस्था राखता यावी यासाठी काही सोशल मीडिया अकाऊंट्स आणि वेबसाइट्स काही काळासाठी बंद करण्यात आली आहेत. भारत सरकारच्या आयटी कायद्याच्या कलम 69अ अंतर्गत, कोणत्याही वेबसाइट्स किंवा सोशल मीडियावर उपलब्ध असलेली माहिती लोकांसाठी बंद करण्याचा आदेश देण्याचा अधिकार आहे. या कायद्यानुसार जून 2020 मध्ये सरकारने अनेक चिनी वेबसाइट बंद केल्या होत्या. दरम्यान, शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर, स्नॅपचॅट आणि इतर अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील काही अकाऊंट्स आणि वेबसाइट्सच्या लिंक्स बंद करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. ही अकाऊंट्स काही काळासाठीच बंद करण्यात आली असून, शेतकऱ्यांचा विरोध संपल्यानंतर ती पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. दरम्यान, शेतकरी नेते आणि केंद्रीय मंत्र्यांसोबत आतापर्यंत चार बैठका झाल्या. या बैठकांमध्ये केंद्राने शेतकऱ्यांसमोर काही प्रस्ताव ठेवले. मात्र, हे प्रस्ताव शेतकरी नेत्यांनी अमान्य केले. सरकारसोबत आता चर्चा करण्यात काही तथ्थ नाही, असं म्हणत शेतकऱ्यांनी आजपासून (बुधवार) दिल्लीच्या दिशेने कूच करण्याची तयारी केली आहे. तसेच, शेतकऱ्यांचे आंदोलन दिल्लीत येण्यापासून रोखण्यासाठी पोलिसांनी दिल्लीच्या सर्व सीमा बंद केल्या आहेत.

'२४ फेब्रुवारीपासून राज्यभर आंदोलन, तर ३ मार्चला रास्तारोको', जरांगेंच्या आंदोलनाची दिशा ठरली !

जालना विशेष प्रतिनिधी :
राज्यात २८ टक्के लोकसंख्या असलेला मराठा समाज अनेक दशकांपासून पिढ्यान पिढ्या मागासलेला राहिला. हा वर्ग इतका दुर्बल आणि वंचित आहे की त्याला विद्यमान मागासवर्गीयांपासून स्वतंत्र आरक्षण देणे गरजेचे आहे, असा निष्कर्ष नोंदवत आणि हीच अपवादात्मक आणि असाधारण परिस्थिती असल्याचे नमूद करून राज्य मागासवर्ग आयोगाने मराठा समाजाला स्वतंत्र संवर्ग करून आरक्षण देण्याची शिफारस केली ही शिफारस स्वीकारून राज्य सरकारने ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला स्वतंत्र १० टक्के आरक्षण दिले. विधिमंडळात विशेष अधिवेशनात मंगळवारी हा कायदा कोणत्याही चर्चेविना एकमताने मंजूर करण्यात आला. दरम्यान, मनोज जरांगे पाटलांनी या विधेयकावर आक्षेप नोंदवून

सगेसोयरे तरतुदीवर ठाम भूमिका घेतली आहे. त्यामुळे आता त्यांनी आंदोलनची पुढची भूमिका बुधवारी स्पष्ट केली. मनोज जरांगे पाटलांनी सरकारला २३ फेब्रुवारीपर्यंत अल्टिमेटम दिला आहे. त्यानुसार, सरकारने सगसोयऱ्यांसदर्भात कायदा केला नाही तर २४ फेब्रुवारीपासून राज्यभर आंदोलन करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यभरातील मराठा बांधवांना आंदोलनाची दिशा स्पष्ट केली आहे. २४ फेब्रुवारीपासून प्रत्येक गावात, शहरात सकाळी साडेदहा वाजल्यापासून दुपारी १ वाजेपर्यंत आंदोलन करायचं आहे. या काळात प्रत्येकाने आपल्या गावात रास्ता रोको करायचा आहे, असं आवाहन मनोज जरांगेंनी आज मराठा बांधवांना केलं. ज्यांना सकाळच्या वेळी आंदोलन करता येणार नाही, त्यांनी सायंकाळी चार ते रात्री ७ वाजेपर्यंत आंदोलन करायचं आहे, असं मनोज जरांगे म्हणाले. तसंच, या काळात शांततेत आंदोलन करायचे आहे. जाळपोळ किंवा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची काळजी घेऊन आंदोलन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, २४ तारखेपासून आपल्या गावात-शहरांत रास्ता रोको केल्यानंतर ३ मार्चला जगातील सर्वांत मोठा रास्ता रोको करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ३ मार्च रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच जिल्ह्यांत, एकाच ठिकाणी एकाच वेळी (दुपारी १२ ते १) मोठा रास्ता रोको करायचा आहे.

दैनिक लोकरक्षणाय
www.lokrakshanay.com
ठाणे, गुरुवार, २२ फेब्रुवारी २०२४

//सुविचार

दगडाला शेंदूर लावून त्याचा देव करता येईल
मात्र माणसाला कोणता रंग लावावा म्हणजे त्याचामाणूस करता येईल. //

पालक खांडवी

साहित्य : १ वाटी बेसन, १ वाटी दही, दीड वाटी पाणी, १/२ वाटी पालकाची पेस्ट, १ चमचा आलं, लसूण व हिरव्या मिरच्यांची पेस्ट, १ चिमूट हिंग, मीठ चवीनुसार.

फोडणीचे साहित्य : १ मोठा चमचा खोबऱ्याचा बुरा, १ चमचा तेल, १ चमचा मोहरी, १ लहान चमचा तिखट.

कृती : सर्वप्रथम बेसनात दही मिसळावे. नंतर त्यात मीठ, पाणी व इतर साहित्य घालून चांगल्याप्रकारे एकजीव करावे, त्यात गोळे नाही पडले पाहिजे. या मिश्रणाला कढईत घालून घट्ट होईस्तोर चांगले हलवावे. एका ताटात थोडासा घोळ घालून पसरवावे व दोन-तीन मिनिटांनी त्याचे रोल तयार करावे, जर रोल आरामात बनले तर समजावे खांडवी तयार आहे. नंतर ताटात किंवा

गॅसच्या ओट्यावर ते मिश्रण १-१ इंचेच्या पातळ स्ट्रिपमध्ये पसरवावे. आता या मिश्रणाचे रोल तयार करावे. गरम तेलात मोहरी व तिखट घालून त्याची फोडणी तयार करून ती त्या रोलवर टाकावी. वरून खोबऱ्याचा बुरा घालून सर्व्ह

पेट्रोलियम जेलीचे विविध उपयोग

पेट्रोलियम जेलीचा उपयोग केवळ त्वचेचा स्निग्धपणा कायम राखण्याइतपतच होतो असं नाही. याव्यतिरिक्तही पेट्रोलियम जेलीच्या काही वेगळ्या उपयोगांविषयी...

मैत्रिणींनो, हिवाळा सुरू झाला की पेट्रोलियम जेलीच्या जाहिराती सर्वत्र झळकू लागतात. हिवाळ्यात असलेल्या कोरड्या हवामानामुळे त्वचा रुक्ष होऊ लागते. अशी खरखरीत त्वचा त्रासदायक ठरते. अशा वेळी या त्वचेला पुन्हा मूळस्वरूपात आणण्याचं काम पेट्रोलियम जेलीचा वापर करून केलं जातं.

अँटी रिंकल क्रीम-
पेट्रोलियम जेलीमुळे त्वचेतील स्निग्धांश कायम राखला जातो. त्यामुळे त्वचा कोरडी पडून अकाली येणाऱ्या सुरकुत्यांच्या प्रमाणात घट होते.

लिप बाम-
पेट्रोलियम जेलीचा उपयोग लिप बामसारखाही केला जातो. पेट्रोलियम जेली ओठांना हायड्रेट करून त्यांचा नरमपणा कायम ठेवते.

नैसर्गिक चमक -
या दिवसात मेकअप केल्यानंतरही चेहरा निस्तेज दिसू लागतो. पेट्रोलियम जेलीच्या वापराने चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येण्यास मदत होते.

मेकअप रिमूव्हर-
मेकअप काढून टाकण्यासाठी मेकअप रिमूव्हरऐवजी पेट्रोलियम जेलीचा वापर करता येणं शक्य आहे.

कलर स्टेन रिमूव्हर-
हेअर कलर करताना हेअर लाइनला पेट्रोलियम जेली लावा. त्यामुळे कलर स्काल्पवर पसरणार नाही.

परफ्यूम बेस-
परफ्यूम मारण्यापूर्वी त्या जागेवर पेट्रोलियम जेली लावा. परफ्यूमचा सुगंध जास्त काळ राहतो.

आफ्टर शेव्ह लोशन-
शेव केल्यानंतर त्वचा कोरडी होते. त्यामुळे त्या ठिकाणी पेट्रोलियम जेली लावा.

जेवण झाल्या-झाल्या टॉयलेटला जावं लागत असल्यास हा उपाय करून बघा

विचार करा ! जर आपण एखाद्या समारंभात गेला आहात. तिथे सर्व पदार्थ आपल्या आवडीचे आहे. पण आपण हे खाण्यास घाबरत आहात. कारण आपल्याला खाल्ल्यावर लगेचच शौचास जावं लागतं. कल्पनेच्या व्यतिरिक्त जे लोक या त्रासाला अनुभवत आहेत किंवा सोसत आहेत त्यांच्यासाठी हे सत्य अनुभवणे फार भयावह आहे.

हा त्रास अधिक गंभीर तेव्हा होतो जेव्हा खाल्ल्यावर टॉयलेटला जाण्यामुळे आपले वजन कमी होतं. बऱ्याच वेळा टॉयलेटला जाण्यामुळे काही लोक जेवणच कमी करतात. म्हणून आज आम्ही आपल्याला सांगत आहोत यावर काही उपाय, जे अवलंबल्याने आपल्याला या त्रासापासून मुक्ती मिळू शकते. सर्वप्रथम समस्येला जाणून घेऊ या.

गॅस्ट्रो कॉलिक रिफलक्स-
जेवण झाल्यावर लगेचच शौचास किंवा टॉयलेटला जाण्याच्या त्रासाला गॅस्ट्रो-कॉलिक रिफलक्स म्हणतात. असे दिसून आले आहे की, हा त्रास त्यांना जास्त होतो ज्यांना बऱ्याच काळ टॉयलेट किंवा शौचास रोखण्याची सवय असते.

हे उपाय अवलंबवा-
- चावून चावून खाणे.
- फायबर असलेले पदार्थ सेवन करावे.
- ३-४ वेळा थोडं-थोडं अन्न खा.

आहारात हे पदार्थ समाविष्ट करा-
या त्रासापासून वाचण्यासाठी फायबर असलेल्या पदार्थांचा समावेश करावा. फायबर असलेल्या पदार्थांमध्ये नाशपती, सफरचंद, वाटाणे, ब्रोकोली, शाबूत धान्य, शेंगा आणि डाळी आहे. तसेच आहारात दही, कच्चं सॅलड किंवा कोशिंबीर, आलं, अननस, पेरू, ओवा इत्यादी समाविष्ट करणे. याशिवाय केळी, आंबे, पालक, टमाटे, शेंगदाणे, शतावरी. या आहारात पोटॅशियम मुबलक प्रमाणात आढळतं, म्हणून हा आहारदेखील

आवळ्याचे सेवन करताना 'या' गोष्टी लक्षात ठेवा

आयुर्वेदामध्ये आवळ्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. आवळ्यामध्ये 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात असतं. उत्तर व दक्षिण भारतात प्रामुख्यानं आवळ्याचं उत्पादन घेतलं जातं. आवळ्याचे 'पांढरे आवळे' आणि 'रान आवळे' असे दोन प्रमुख प्रकार आहेत. आवळ्याच्या सेवनानं शरीर शुद्ध होऊन रोगप्रतिकारक शक्ती वाढते. आवळ्याचा हंगाम आता सुरू झाला आहे, त्यामुळे बाजारात मोठ्या प्रमाणात आवळे उपलब्ध आहेत. चला तर मग या बहुगुणी आवळ्याचे फायदे आणि तो कधी खाणं योग्य ठरेल हे जाणून घेऊ.

आवळ्याचे फायदे
- डोकं शांत राहणं किंवा केसांच्या सर्व तक्रारींसाठी आवळ्याचं तेल इतर औषधींसह नियमित वापरल्यास फरक पडतो.
- ज्यांना पित्ताचा त्रास आहे त्यांनी सकाळी 'मोरावळा' खाल्ल्यास फायदेशीर ठरेल.
- लघवी साफ न होणे, आम्लपित्त, चक्कर येणे, पोट साफ न होणे अशा अनेक तक्रारींवर आवळा अत्यंत गुणकारी आहे.
- आवळ्यात 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असल्यामुळे त्वचा रोगावर आवळा उत्तम औषध आहे.
- आवळ्याच्या नियमित सेवनाने शरीरातील रक्ताभिसरण क्रिया सुरळीत चालू राहते.

लक्षद्वीपमध्ये प्रवास करण्यासाठी भारतीयांना घ्यावं लागतं परमिट; असा करा अप्लाय

भारतीय नागरिक थेट लक्षद्वीपसाठी विमान बुक करून जाऊ शकत नाहीत, त्याआधी त्यांना परमिट घ्यावं लागतं. हे परमिट ऑनलाइन मिळण्याची आम्ही पद्धत पुढे दिली आहे.

मिळवता येतं. जर तुम्हाला ऑनलाइन परमिटसाठी अर्ज करायचा असेल तर पुढील स्टेप को फॉलो करा:

लक्षद्वीप बेटावर ऑनलाइन प्रवेश परवानगी प्रोसेस

सध्या लक्षद्वीप खूप चर्चेचा विषय बनला आहे. अरबी समुद्रात असलेल्या या द्वीप समूहात एकूण ३६ बेटे आहेत. जर तुम्हाला इथलं नैसर्गिक सौंदर्य पाहायला जायचं असेल तर तुम्हाला आधी लक्षद्वीप परमिट घ्यावं लागेल. एण्ट्री परमिट तुम्ही ऑनलाइन देखील मिळवू शकता. चला जाणून घेऊया लक्षद्वीपसाठी ई-परमिट कसं लक्षद्वीपसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही पद्धतीनं परमिट

सर्वप्रथम लक्षद्वीप ई-परमिट पोर्टल https://epermit.utl.gov.in//poges/sigfup वर जा.

तिथे रजिस्ट्रेशन करा. त्यासाठी नाव, ईमेल आयडी आणि मोबाइल नंबर नोंदवा.

त्यानंतर तुमच्या मोबाइल नंबरवर ओटीपी येईल, जो टाकल्यानंतर नंतर पासवर्ड, कॅप्चा कोड टाकून सर्वात खाली रजिस्टर बटन मिळेल, त्यावर टॅप करा.

रजिस्ट्रेशन कंप्लीट झाल्यानंतर होम पेजवर साइन-इनचा ऑप्शन मिळेल, तुमचा ईमेल आयडी, पासवर्ड आणि कॅप्चा कोड टाका आणि लॉगिन करा.

त्यानंतर ई-परमिटच्या सेक्शनमध्ये जा.

त्यानंतर अप्लाय फॉर न्यू परमिटवर क्लिक करा.

एक नवीन पेज ओपन होईल, ज्यात तुम्हाला लक्षद्वीपच्या भेटीचं कारण, कालावधी, रेशनकार्ड नंबर, कोणत्या बेटावर राहणार इत्यादी माहिती द्यावी लागेल. तसेच आवश्यक डॉक्युमेंट देखील अपलोड करावे लागतील.

त्यानंतर तुम्हाला ऑनलाइन परमिट फीस द्यावी लागेल. मग तुम्हाला परमिट रिक्वेस्ट नंबर मिळेल.

तुमचं परमिट ट्रॅक करण्यासाठी तुम्हाला ट्रॅक परमिट ऑप्शनवर क्लिक करावे लागेल. त्यानंतर तुम्हाला परमिट रिक्वेस्ट नंबर टाकून सबमिट बटनवर क्लिक करा. म्हणजे तुमच्या परमिटच्या स्टेटसची माहिती मिळेल.

ई-परमिट तुम्हाला ईमेलच्या माध्यमातून ट्रिप डेटच्या १५ दिवस आधी मिळेल.

लक्षद्वीप ई-परमिटचे शुल्क

लक्षद्वीपचे रहिवासी आणि सरकारी कर्मचारी ज्यांची ड्युटी लक्षद्वीपमध्ये आहे, त्यांना परमिटची आवश्यकता नाही. परंतु त्याव्यतिरिक्त सर्व भारतीय नागरिक आणि परदेशी पर्यटकांना परमिट घेणं आवश्यक आहे. तसेच पर्यटकांना सर्व बेटांवर जातात येत नाही. भारतीय पर्यटक फक्त कावरत्ती, अगत्ती, बंगाराम, कदमत आणि मिनिकॉय बेटांवर जाऊ शकतात.

लक्षद्वीप ई-परमिटसाठी प्रति व्यक्ती ५० रुपये द्यावे लाटत. तसेच, १२- १८ वर्षांच्या नागरिकांसाठी हेरिटेज फी १०० रुपये आणि तसेच १८ वर्षांवरील नागरिकांसाठी हेरिटेज फी २०० रुपये आहे.

लक्षद्वीप परमिटसाठी आवश्यक डाक्युमेंट्स
पासपोर्ट साइज फोटो
वैध ओळखपत्र (आधार कार्ड, व्होटर आयडी, रेशन कार्ड इत्यादी)ट्रॅव्हल प्रूफ (विमानाचं तिकीट, बोट रिजर्व्हेशन)
हॉटेल बुकिंग कन्फर्मेशन इत्यादी

ओलसर कपड्यांमुळे पुरळ

पावसाळ्यात अंघोळीनंतर ओलसर दमट कपडे वापरणे शक्यतो टाळावे. आतील कपडे पूर्णपणे वाळलेले नसल्यास इस्त्री फिरवून ते पूर्णपणे कोरडे करून वापरावेत, नाही तर अंगावर पुरळ येण्याची शक्यता असते.

अथांग समुद्र, रोमँटिक पोझ अन, प्रथमेश परबचं क्षितीजाबरोबरचे प्री-वेडिंग फोटोशूट

मराठीतील लोकप्रिय अभिनेता प्रथमेश परब सध्या खूपच चर्चेत आहे. १४ फेब्रुवारी म्हणजेच व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी त्याचा साखरपुडा पार पडला. या साखरपुड्याचे अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. आता २४ फेब्रुवारीला प्रथमेश त्याची प्रेयसी क्षितिजा घोसळकर हिच्याबरोबर लग्नगाठ बांधणार आहे. प्रथमेश सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असतो. निरनिराळे फोटो व व्हिडीओ तो चाहत्यांबरोबर शेअर करीत असतो. दरम्यान, प्रथमेशच्या नव्या फोटोने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. नुकतेच प्रथमेश व क्षितिजाने प्री-वेडिंग फोटोशूट केले. कोकणात श्रीवर्धन येथे समुद्रकिनाऱ्याजवळ दोघांनी फोटोशूट केले. यावेळी दोघांनी पांढऱ्या रंगाचे कपडे घातले होते. प्रथमेशने पांढऱ्या रंगाचा कुर्ता वा पायजमा घातला होता; तर क्षितिजाने पांढऱ्या रंगाची साडी नेसली होती. त्याबरोबर तिने केसांत गुलाबाचे फूलही माळले होते. या लूकमध्ये दोघे खूपच सुंदर दिसत होते. मंगळ आणि बुध ग्रह जवळ येणार, पूर्व क्षितीजावर अपूर्व अनुभूती; वाचा अनोख्या दृष्याचा आनंद केव्हा घेता येणार? प्रथमेशने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर या फोटोशूटचे काही निवडक फोटो शेअर केले आहेत. प्रथमेशचे हे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. अनेक चाहत्यांनी या फोटोवर कमेंट्स केल्या आहेत. प्रथमेशच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास, आतापर्यंत त्याने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे.

तंबूतून टॉवरपर्यंत! यशस्वी जैस्वालची गगनभरारी; मुंबईत घेतलं ५ कोटींचं घर!

अतिशय सामान्य कुटुंबातून येऊन आज देशभरात स्वतःचे नाव गाजविणारा भारताचा फलंदाज यशस्वी जैस्वालनं मुंबईत आपल्या हक्काचं घर घेतलं आहे. एकेकाळी मुंबईत तंबूत गुजराण करणाऱ्या यशस्वी जैस्वाल आणि त्याच्या कुटुंबियांसाठी हा नक्कीच अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. अतिशय खडतर परिस्थितीतून येऊन आपल्या स्वप्नांचा पाठलाग करणाऱ्या यशस्वीने वांद्रे पूर्व येथील बीकेसी प्रोजेक्टमध्ये एक आलीशान घर घेतले आहे. या घराची किंमत ५.३८ कोटी असल्याचे सांगितले जाते. सध्या निमार्णाधीन असलेल्या या प्रकल्पातील घराचे क्षेत्रफळ १,११० स्वे. फूट असल्याचे झॅपकी या बांधकाम क्षेत्राशी निगडित असलेल्या संकेतस्थळाने निदर्शनास आणून दिले आहे. मनीकंट्रोलने दिलेल्या बातमीनुसार, बीकेसी प्रोजेक्टची निमार्ती कंपनी अदाणी रिएलीटी ने मात्र या व्यवहाराबाबत कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. बीकेसी प्रोजेक्टला थोडी वादाची पार्श्वभूमी आहे. त्याचे मूळ प्रवर्तक असेलल्या रेडीयस इस्टेटची दिवाळखोरी जाहीर झाल्यानंतर अदाणी रिएलीटीने प्रकल्पाचे काम हाती घेतले. वांद्रे कुर्ला संकुलातील या घराच्या प्रति स्क्वे. फूटासाठी यशस्वी जैस्वालने तब्बल ४८,००० रुपये मोजले आहेत. या वर्षीच्या अखेरीपर्यंत हा प्रकल्प पूर्ण होण्याचे संकेत दिले जात आहेत. १९ वर्षांखालील संघात धडाकेबाज कामगिरी केल्यानंतर २०२० साली राजस्थान रॉयल्सने तब्बल २.४ कोटी खर्च करून यशस्वी जैस्वालला संघात घेतले होते. २०२२ साली राजस्थानने चार कोटी रुपये मोजून त्याला संघात कायम ठेवले. २०२३ च्या आयपीएल हंगामात यशस्वी जैस्वालने अवघ्या १३ चेंडूंत तडाखेबाज फलंदाजी करत अर्धशतक पूर्ण केले. ही कामगिरी करताना त्याने केएल राहूल आणि पॅट कमिन्स यांचा विक्रम मोडीत काढला. डीएनएने दिलेल्या बातमीनुसार, जैस्वालची एकूण संपत्ती १०.७३ कोटी असल्याचे सांगितले जाते. आयपीएल वगळता भारताचा हा तरुण क्रिकेटपटू महिन्याकाठी ३५ लाखांची कमाई करतो.

दै. लोकरक्षणाय सुडोकू - १३

8		9			4		3	5
1		7	9	2		4	6	
				6		9	7	
7								3
	2		8					
5		6	1	3			9	
6	3	4		5				
				9		3		
					1			

उत्तर सुडोकू -१२

5	3	4	6	2	1	9	8	7
6	2	8	5	7	9	3	1	4
7	9	1	8	3	4	2	5	6
8	5	2	1	6	3	4	7	9
1	6	9	4	8	7	5	2	3
3	4	7	9	5	2	8	6	1
4	8	3	7	1	5	6	9	2
9	1	5	2	4	6	7	3	8
2	7	6	3	9	8	1	4	5

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

दिनविशेष

२२ फेब्रुवारी

- १८१९: स्पेनने फ्लोरिडा हा प्रांत अमेरिकेला ५० लाख डॉलरच्या मोबदल्यात विकला.
- १९४२: दुसरे महायुद्ध झ फिलिपाईन्समध्ये जपानी सैन्याकडुन पराभव अटळ दिसत असल्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष एफ. डी. रूझवेल्ट यांनी जनरल डग्लस मॅकआर्थरला माघार घ्यायचा हुकुम दिला.
- १९४८: झेकोस्लोव्हाकिया मध्ये कम्युनिस्ट क्रांती.
- १९५८: इजिप्त आणि सीरिया या देशांनी एकत्र येऊन युनायटेड अरब प्रजासत्ताक तयार केले.
- १९७८: श्री. यशवंत विष्णू चंद्रचूड यांनी भारताचे १६ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
- १९७९: सेंट लुशिया ला ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाले.
- १७३२: अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांचा जन्म. (मृत्यू: १४ डिसेंबर १७९९)
- १८३६: महामहोपाध्याय पण्डित महेशचंद्र न्यायरत्न भट्टाचार्य यांचा जन्म. (मृत्यू: १२ एप्रिल १९०६)
- १८५७: जर्मन भौतिकशास्त्रज्ञ हेनरिच हर्ट्झ यांचा जन्म. (मृत्यू: १ जानेवारी १८९४)
- १८५७: बालवीर चळवळीचे प्रणेते लॉर्ड बेडन पॉवेल यांचा जन्म. (मृत्यू: ८ जानेवारी १९४१)
- १९०२: जर्मन भौतिकशात्रज्ञ फ्रिट्झ स्ट्रासमान यांचा जन्म. (मृत्यू: २२ एप्रिल १९८०)
- १९२०: चरित्र अभिनेता इफ्तिखार यांचा जन्म. (मृत्यू: ४ मार्च १९९५)
- १९२२: व्हायोलिनवादक व्ही. जी. जोग यांचा जन्म. (मृत्यू: ३१ जानेवारी २००४)
- १९६४: मॉर्टल कोमबॅट व्हिडिओ गेमचे निर्माते एड बून यांचा जन्म.
- १९७५: अमेरिकन अभिनेत्री, दिग्दर्शक, निमार्ता ड्रिव बॅरीमोर यांचा जन्म
- १८१५: हिरा हा कार्बनच असतो हे प्रयोगावरुन सिद्ध करणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ स्मिथसन टेनांट यांचे निधन. (जन्म: ३० नोव्हेंबर १७६१)
- १८२७: चित्रकार, निसर्गवैज्ञानिक व सैनिक चार्ल्स विल्सन पील अमेरिकन यांचे निधन. (जन्म: १५ एप्रिल १७४१)

भविष्य

मेष मतभेद होणार नाहीत याची काळजी घ्या. शांत राहणे सर्वात उत्तम. इतरांनी काय करावे, काय करू नये याचा सल्ला देत बसू नका.

वृषभ जे दिवस चांगले आहेत अशा कालावधीत एका दगडात दोन पक्षी मारण्याचा डाव साध्य होईल. तेव्हा आता कामाला लागा.

मिथुन इतरांशी तुलना करणे टाळा. स्वतःच्या कामाची जबाबदारी कोणावर सोपवू नका. त्यामुळेतुमची घडी विस्कळीत होणार नाही हे लक्षात ठेवा.

कर्क व्यावसायिकदृष्टया परिस्थितीत बदल होईल आणि तो चांगला असेल. नोकरदार वगार्ला वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. अनावश्यक खर्च टाळा. मित्र-मैत्रिणींशी करमणूक होईल.

सिंह बाकी दिवसांचा कालावधी उत्तम असेल. ज्यावेळी कालावधी उत्तम असतो. त्यावेळी मात्र कोणत्याही कामासाठी फार कसरत करावी लागत नाही. धार्मिक गोष्टीत उत्साह वाढेल.

कन्या ज्या कामांमध्ये प्रयत्न करूनही यश मिळत नव्हते त्या कामामध्ये यश मिळेल. व्यवसायात खरेदी-विक्रीचे व्यवहार मोठया प्रमाणात होतील. नोकरदार वगार्चे कामाचे नियोजन उत्तम राहील.

तुला नोकरदार वर्गाच्या कामातील तांत्रिक अडचणी कमी होतील आर्थिक बाबतीत समाधानी राहाल.राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवायचे नाही म्हटले तरी ठेवावे लागेल. त्यामुळे प्रतिष्ठा वाढेल.

वृश्चिक आर्थिक भरभराट होईल. राजकीय क्षेत्रात धाडसी निर्णय घ्याल. स्थावर मालमत्तेचा प्रश्न निकालात निघेल. नातेवाईकांकडून शुभेच्छा मिळतील. धार्मिक कायार्ची आवड राहील.

धनु आपली देहबोली सांभाळा. इतरांकडून फारशी अपेक्षा ठेवू नका. तुम्हाला स्वतःलाही काही प्रयत्न करावे लागतील. तेव्हा कोण चांगले कोण वाईट या गोष्टीचा सध्यातरी विचार करत बसू नका.

मकर आर्थिक बाबतीत नियोजन करावे लागेल. शेजाऱ्यांशी जेवढयास तेवढे राहा. कौटुंबिक वादविवाद टाळा. जोडीदाराच्या भावनांचा आदर करा. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका.

कुंभ व्यवसायात धरसोड वृत्ती राहील. नोकरदार वगार्ला कामाच्या बाबतीत व्यवहार चोख ठेवावे लागतील. षष्ठस्थानातून अष्टमस्थानाकडे चंद्राचे भ्रमण होत आहे असे भ्रमण म्हणजे दुधात मिठाचा खडा असे म्हणायला हरकत नाही.

मीन सध्या दिवस चांगले नाहीत हे माहीत असतानासुद्धा वादविवाद करणे तुमच्यासाठी त्रासाचे राहील. कोणाच्या वागण्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका. प्रत्येक दिवस चांगला कसा घालवता येईल या दृष्टीने प्रयत्न करा. आपली डाळ शिजणार नाही.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

साट्यालोट्याच्या योजनेला दणका

निवडणूक रोख्यांची केंद्राची योजना सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवली. बड्या कंपन्या वा शक्तींनी आर्थिक बळाच्या जोरावर सरकारच्या निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकू नये, यासाठी जी खंबीर भूमिका घेतली ती देशाला फार मोठा दिलासा देणारी आहे. आपले सर्वोच्च न्यायालय लोकशाहीचा एक भक्कम आधारस्तंभ म्हणून अद्यापही काम करीत आहे, हे या निर्णयातून दिसून आले. राजकीय पक्षांना उद्योगधंद्यांनी निधी देणे, ही काही नवी गोष्ट नाही. अगदी स्वातंत्र्यलढ्याच्या काळातही राजकीय पक्षांना काही व्यापारी घराण्यांनी विविध प्रकारे मदत केलीच आहे. त्यानंतरही वेगवेगळ्या प्रकारे हा ओघ चालू राहिला. परंतु त्याला यंत्रणात्मक स्वरूप देताना सर्वात वादग्रस्त ठरलेली योजना म्हणजे २०१७ मध्ये आलेली केंद्र सरकारची इलेक्टोरल बॉण्ड्स ची (निवडणूक रोखे) योजना. या योजनेला अनेकांनी उद्योजक व पुढारी यांच्यातले साटेलोटे म्हणजेच तुम्ही माझी पाठ खाजवा, मी तुमची खाजवतो असे लेबल लावले होते. ही योजना बड्या उद्योगसंस्था आणि राजकीय पक्षांमधील एक परस्परांचे हितसंबंध सांभाळणाऱ्या व्यवस्थेला प्रोत्साहन देत होती. त्यामुळे विरोधी पक्षांपेक्षा सत्ताधारी पक्षाचे अधिक फावले. निवडणूक रोखे योजनेच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अंतर्गत दाखल करण्यात आल्या होत्या. याचिकांमध्ये वित्त कायदा २०१७ च्या तरतुदींनाही आव्हान देण्यात आले. त्याचबरोबर ह्यरिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा-१९३४, लोकप्रतिनिधी कायदा-१९५१, प्राप्तिकर कायदा-१९६१ यांच्या तरतुदीतही बदल करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. त्यामध्ये माहिती तंत्रज्ञान कायदा आणि कंपनी कायदा-२०१३ चाही समावेश होता. केंद्र सरकार याबाबत प्रचंड उत्साही असताना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जानेवारी २०१७ मध्ये अर्थमंत्रालयातील संयुक्त सचिवांना पत्र लिहून या योजनेबद्दल आपली काही निरीक्षणे सादर करताना काही मुद्यांवर हरकत घेतली होती. विशेषतः देणगीदाराचा तपशील गोपनीय ठेवणे हे उघडउघड पारदर्शित्वाच्या तत्त्वालाच मुरड घालणारे आहे, यावर बोट ठेवले होते. हा आक्षेप खरेतर रास्त होता. मात्र, त्यावर रिझर्व्ह बँकेला या योजनेचा मूळ उद्देशच समजला नाही, असे नमूद करणारे पत्र मंत्रालयाने उत्तरादाखल पाठवले. रिझर्व्ह बँकेने निवडणूक रोखे योजना केंद्रीय मंडळासमोर चर्चेसाठी ठेवली. समितीने या योजनेबाबत गंभीरपणे काही आक्षेप नोंदवले. रिझर्व्ह बँकेने सप्टेंबर २०१७ मध्ये अर्थमंत्र्यांना निरीक्षणे कळवली होती. दरम्यान, मे २०१७ मध्ये निवडणूक आयोगाने कायदा आणि न्याय मंत्रालयालाही पत्र लिहिले की, वित्त कायद्यान्वये प्रस्तावित करण्यात आलेल्या माहिती तंत्रज्ञान कायदा, लोकप्रतिनिधी कायदा आणि कंपनी कायद्यातील प्रस्तावित सुधारणा प्रत्यक्षात आल्यास राजकीय पक्षांच्या वित्त/निधीच्या पारदर्शकतेवर गंभीर परिणाम होतील. रोख्यांद्वारे देणग्या मिळाल्यास त्या उघड करणे बंधनकारक नसेल तर, हे नक्कीच प्रतिगामी पाऊल ठरेल. तरीही दोन जानेवारी २०१८ रोजी अर्थमंत्रालयाने आरबीआय कायद्या च्या कलम ३१(३) अंतर्गत निवडणूक रोखे योजना २०१८ अधिसूचित केली. निवडणूक रोखे प्रॉमिसरी नोट च्या स्वरूपात जारी केले गेले. त्यावर खरेदीदाराच्या नावाचा उल्लेख नव्हता. यामुळे पुढील व्यक्तींना रोखे खरेदी करणे शक्य होते - १) भारताचा नागरिक, २) भारतात स्थायिक झालेला व्यक्ती. यातील व्यक्ती मध्ये अ) एक व्यक्ती एकट्याने किंवा इतर व्यक्तींसह संयुक्तपणे समाविष्ट आहे, तसेच (ब) हिंदू अविभक्त कुटुंब, (क) एखादी कंपनी (ड) छोटी संस्था (फर्म) (इ) संघटना किंवा संस्था (ई) वरीलपैकी कोणत्याही श्रेणीत न बसणारी, पण न्यायाच्या कक्षेत येणारी व्यक्ती (फ) अशा व्यक्तीच्या मालकीची किंवा तिने नियंत्रित केलेली कोणतीही एजन्सी, कार्यालय किंवा शाखा. तसेच, खरेदीदाराने दिलेली माहिती संबंधित बँकेने गोपनीय ठेवायला हवी आणि केवळ न्यायालयाच्या किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने मागणी केल्यावर उघड करावी, असा उल्लेख होता. यावर आक्षेप घेणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने उचलून धरली आणि ही योजना घटनाबाह्य असल्याचे स्पष्ट केले. याचे कारण देणगीदार आणि सत्तेत येणारे पक्ष यांचे साटेलोटे यात निर्माण होऊ शकते. व्यक्तिगत देणगीदारापेक्षा देणगी देणाऱ्या बड्या कंपन्यांच्या बाबतीत याची शक्यता जास्त असल्यानेच न्यायालयाने बड्या उद्योगसंस्था आणि सरकार यांच्यात लागेबांधे निर्माण करणारी व्यवस्था रद्दबातल ठरविणारा निर्णय दिला. आपला राजकीय कल कुणीकडे आहे, या बाबतीत व्यक्तीला गोपनीयता ठेवण्याचा पूर्णपणे हक्क आहे; परंतु राजकीय पक्षांना देणग्या देऊन धोरणनिर्मितीवर प्रभाव टाकण्याइतकी त्या हक्काची व्याप्ती नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. हा निकाल देताना न्यायालयाने माहितीचा हक्क आणि गोपनीयतेचा हक्क यांच्यात समतोल ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. एखादी व्यक्ती वा संस्था राजकीय पक्षांना देणगी देऊ शकते. मात्र ही गोष्ट गुप्त न ठेवता देणगीदाराने आपली राजकीय भूमिका जाहीर केली, तर त्यावर आक्षेप घेता येणार नाही, हे बरोबर आहे.

वाईटांचा वसंतोत्सव!

संदेशखाली प्रकरणाची बरोबरी मणिपूरशी करण्याचा अतिउत्साही भाजप खासदारांचा प्रयत्न सर्वोच्च न्यायालयाने हाणून पाडला असला तरी त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अजिबात कमी होत नाही. संदेशखाली हे पश्चिम बंगालची राजधानी कोलकातापासून शंभरभर किलोमीटरपेक्षाही कमी अंतरावर असलेले मागास ठिकाण. त्या परिसरात तृणमूल काँग्रेसच्या स्थानिक नेत्याने अनेक मजूर महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. त्याच्यावरील कारवाईसाठी त्यामुळे तेथे आंदोलन झाले आणि स्थानिक भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी हा मुद्दा लावून धरला. S

भाजपने यात विशेष लक्ष घातले याचे साधे- आणि अर्थातच महत्त्वाचे- कारण म्हणजे संदेशखाली कथित अत्याचार प्रकरणातील आरोपी. त्याचे नाव शाजहान शेख. आपल्याकडे शहरे वगळता अन्यत्र अनेक प्रांतांत स्थानिक राजकीय दांडगेश्वरांची हुकूमत असते. पक्ष कोणताही असो. सत्ताधाऱ्यांस असे दांडगेश्वर हवे असतात आणि या दांडगेश्वरांस सत्ताधार गरजेचा असतो. पश्चिम बंगालात डावे जेव्हा सत्तेवर होते तेव्हाही अशा स्थानिक दांडगेश्वरांची संख्या मुबलक होती आणि डावे जाऊन तृणमूलची सत्ता आली तरी त्यांची संख्या कमी झालेली नाही. हा शाजहान शेख या अशांतीलच एक. ही असली मंडळी आपापल्या परगण्यात एक प्रकारची खंडणीखोरीच करीत असतात आणि सत्ताधीशांचे त्यास अभय असते. या शेखास असे अभय होते असा विरोधकांचा आरोप आहे. या अभयामुळेच सदर परिसरात त्यांची दांडगाई सुरू होती. त्यातूनच दमदाटी करून त्याने आपल्या इलाख्यात काम करणाऱ्या महिलांवर लैंगिक अत्याचार केले असा आरोप आहे. त्यावरून गेले काही दिवस भाजप आणि तृणमूल पुन्हा एकदा हमरीतुमरीवर आले असून जे घडते आहे त्यावरून एक विदारक चित्र निर्माण होते.

डाव्यांची दादागिरी मोडून ममता बॅनर्जी यांनी सत्ता खेचून आणली आणि नंतर तीन वेळा राखली असली तरी आपल्या राज्यात कायद्याचे राज्य निर्माण करण्यात त्यांना यश आले असे म्हणता येणार नाही. गुंडांच्या शाखांवरचा झेंडा तितका बदलला. डाव्यांच्या राज्यात लाल सलाम म्हणत गुंडगिरी होत असे. ती जाऊन तृणमूलची भाषा आली इतकाच काय तो बदल. यासाठी केवळ त्या राज्यातील राजकीय पक्षांनाच दोष देणे अन्यायाचे ठरेल. यात त्या राज्यातील राजकीय संस्कृतीही तितकीच कारणीभूत आहे हे नाकारता येणार नाही. डाव्यांच्या प्रदीर्घ राजवटीमुळे असेल किंवा त्याहीआधी भारत-पाकिस्तान फाळणीतील नोआखाली अनुभवल्यामुळे असेल; त्या राज्यातील राजकारणाची रक्तरंजितता काही कमी होताना दिसत नाही. तेव्हा अशा परिस्थितीत तृणमूलच्या शाजहान शेख याने असे काही केले नसेल असे जसे छातीठोकपणे म्हणता येत नाही तसेच त्याच्याविरोधात सत्यापेक्षा कांगावा अधिक नाही, असेही म्हणता येणार नाही. त्यात सदर आरोपीचे शेख असणे भाजपच्या पथ्यावर पडले असणार. गेल्या विधानसभा निवडणुकांत प. बंगालातील अल्पसंख्याकांनी तृणमूलला मोठा आधार दिला. तेव्हा त्या पक्षापासून अल्पसंख्याकांस तोडण्यासाठी या घटनेचा उपयोग करण्याचा विचार भाजप नेतृत्वाच्या मनात आला असेल तर ते प्रचलित राजकीय संस्कृतीनुसारच झाले असे म्हणता येईल. याचे कारण साध्यसाधनविवेक वा नैतिकता इत्यादी मुद्दे भाजपने या शेखाविरोधात रान उठवण्यामागे आहेत असे असते तर तृणमूलातील भ्रष्टाचारी हिंदूंना भाजपने स्वतःच्या पदराखाली घेऊन पवित्र केले नसते. पण सदर प्रकरणातील आरोपी शेख असल्याने भाजप त्यास जवळ करणे शक्य नाही आणि या अल्पसंख्याकांची तृणमूलशी असलेली जवळीक सहन करणेही भाजपस अशक्य. तेव्हा हे प्रकरण गाजणार, गाजवले जाणार हे ओघाने आलेच. तसेच झाले. प. बंगालात प्रभाव विस्तारासाठी जंगजंग पछाडणाऱ्या भाजपच्या हाती तृणमूलने हे आयते कोलीत दिले आणि भाजपने त्याचा पुरेपूर वापर केला. त्यात भाजपला दोष देता येणार नाही. सदर प्रकरणी अधिक सजगता दाखवायला हवी होती ती सत्ताधारी तृणमूलने.

कारण विरोधी पक्षीयांची सत्ता असलेल्या राज्यात पराचा कावळा करण्यासाठी भाजप किती टपलेला असतो आणि त्यात भाजप-नियुक्त राज्यपाल किती उत्साही साथ देतात याचे असंख्य दाखले देता येतील. असे असताना भाजपला संधी मिळणार नाही, याची खबरदारी घेणे हे तृणमूलचे- म्हणजेच त्या पक्षाच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांचे- कर्तव्य होते. ते त्यांनी निभावले नाही. तेव्हा भाजपवर या प्रकरणी राजकारण करत असल्याच्या ममताबाईंच्या आरोपात तथ्य कमी, कांगावा अधिक आहे. एक जागरूक विरोधी पक्ष म्हणून भाजप हे करणारच. त्यांना तसे करण्याची संधी न देण्यात खरे शहाणपण आहे. त्याच्या अभावाचे प्रदर्शन ममताबाई सातत्याने करतात. भाजप अनेक अंगांनी लढतो. याआधी महुआ मैत्रा प्रकरणातही हे वास्तव दिसून आले. त्याच प्रकारे इथेही भाजपच्या संसदीय शाखेने आपल्या विशेषाधिकाराचा भंग झाल्याचे कारण पुढे करीत या प्रकरणातील चौकशी वेगळ्याच पातळीवर नेण्याचा प्रयत्न केला. भाजप नेत्यांनी संदेशखाली येथील पीडितांच्या भेटीसाठी प्रयत्न केला असता त्यास ममता बॅनर्जी सरकारने विरोध केला, यापासून रोखले, असले थातूरमातूर कारण पुढे करत भाजप खासदारांनी केंद्रीय अन्वेषण विभागातर्फे याची चौकशी करवण्याचा घाट घातला. सर्वोच्च न्यायालयाने हा डाव उधळला. पण त्यामुळे ममताबाईंना मिळणारा दिलासा क्षणिक असेल. कारण या प्रकरणातील आरोपीस अद्यापही अटक करण्यात त्यांच्या सरकारला यश आलेले नाही. हा शेख जोपर्यंत जेरबंद होत नाही तोपर्यंत भाजप हा विषय तापवणार. परंतु तसे करण्यामागे संदेशखाली येथील अभागी महिलांची काही दयामाया भाजपस येते, त्यांच्याविषयी काही सहानुभूती आहे असा विचार करण्याची अजिबात गरज नाही. इतकी अंधभक्ती केवळ भक्तांनाच शोभेल. याचे कारण महिला अत्याचार, सार्वजनिक जीवनात महिलांचा आदर वगैरे मूल्ये भाजपकडून पाळली जात असती तर मणिपुरी महिलांच्या अब्रूचे धिंडवडे जगाच्या चव्हाट्यावर मांडले गेले नसते. संदेशखाली प्रकरणाची तुलना मणिपुरात जे घडले त्याच्याशी करण्याचा प्रयत्न काहींनी केला. ते जमले नाही. मणिपुरातील महिलांना अद्याप न्याय मिळालेला नाही; हे सत्य. इतकेच काय भाजपसाठी स्त्रीदाक्षिण्य, महिलांचा सम्मान इत्यादी मूल्ये खरोखरच महत्त्वाची असती तर त्या ब्रिजभूषणाचे काय हा प्रश्न समोर येतो. कुस्ती खेळात देशाचे नाव उजळ करणाऱ्या महिला कुस्तीपटूंवर या ब्रिजभूषणाने केलेल्या अत्याचारांची दखल भाजपने किती त्वरेने घेतली हे सर्व देशाने पाहिले. तेव्हा तृणमूल काय किंवा भाजप काय! उडदामाजी काळेगोरे हेच काय ते सत्य. तेव्हा हा पक्ष चांगला की तो वाईट हा मुद्दाच नाही. तर सध्याच्या राजकारणाची स्पर्धा हा तो मुद्दा आहे. ही स्पर्धा तुम्ही वाईट, आम्ही चांगले अशी अजिबात नाही. ती आहे ह्यआम्ही वाईट असू तर तुम्हीही चांगले नाहीह्ण; हे दाखवून देण्याची. आमच्याकडे ब्रिजभूषण आहे तर तुमच्याकडे शाजहान शेख. आमचे मणिपूर तर तुमचे संदेशखालीही मणिपूरच. असा हा सगळा प्रकार. इतके दिवस ही व्हॉटअबाऊटरी परिघावरच्या समाजमाध्यमांतील फुकट्या फॉरवर्डींपुरतीच मर्यादित होती. परंतु कडेचा गाळ जसजसा मध्ये येत गेला तसतशी ही व्हॉटअबाऊटरी राजकारणाच्या मध्यवर्ती युक्तिवादाचा भाग बनली. त्यामुळे सध्याचे राजकारण हे वाईटांचा वसंतोत्सव बनले आहे. हे सत्य स्वीकारण्याचा प्रामाणिकपणा नैतिकवादी आणि नवनैतिकवादी यांच्यात आहे किंवा काय, हाच काय तो प्रश्न.

निकृष्ट रस्त्याचे काम रोखले

ठेकेदारविरोधात ग्रामस्थ आक्रमक, रस्त्याचे काम अयोग्य

■ **वाडा** : तालुक्यातील मांडा-भोपीवली-खरीवली या रस्त्याची काही वर्षांपासून दुरवस्था झाली होती. ग्रामस्थांनी शासन दरबारी हेलपाटे मारून अखेर हा रस्ता यावर्षी मंजूर झाला. रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली, मात्र ठेकेदाराकडून रस्त्याचे काम नियमाप्रमाणे होत नसून, हे काम निकृष्ट दर्जाचे सुरू केल्याने ग्रामस्थांनी निकृष्ट कामाचा जाब ठेकेदाराला विचारत सोमवारपासून कामबंद केले आहे. जोपर्यंत दर्जेदार काम केले जात नाही, तोपर्यंत काम चालू न करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामीण भागातील रस्ते दर्जेदार व्हावेत म्हणून सरकारने पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर मुख्यमंत्री ग्रामसडक अंतर्गत रस्त्यांसाठी भरीव निधी दिला. वाड्यातील ५.२ किमीच्या रस्त्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सुमारे ११ कोटी १२ लाखांचा निधी या रस्त्यासाठी मंजूर केला.

मात्र रस्त्याचे काम करताना ठेकेदार कंपनीने गुणवत्ता राखली गेली नसल्याचा स्थानिक नागरिकांचा आरोप आहे.

> या रस्त्यासाठी मोठा निधी मिळाल्याने रस्त्याचे काम चांगल्या दर्जाचे व गुणवत्तापूर्ण व्हायला हवे, मात्र या कामात ठेकेदार कंपनीने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून गुणवत्ता राखलेली नाही. त्यामुळे हे काम आम्ही बंद केले आहे.
>
> – **आझाद अधिकारी**, उपसरपंच, ग्रा.पं. खरीवली

> ग्रामस्थ व ठेकेदाराची संयुक्त बैठक बोलावून ग्रामस्थांच्या तक्रारींचे निवारण करून नंतर काम सुरू करण्यात येईल.
>
> – **विनोद घोलप**, अभियंता, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना

> मांडा-भोपिवली-खरीवली या रस्त्याचे काम नियमाप्रमाणे सुरू आहे.
>
> – **संदीप ठाकरे**, मयूर

मांडा-भोपीवली-खरीवली रस्त्याच्या ५.२ किमी अंतरात सुमारे चार मोऱ्या व एक सेफ्टी व्हॉल्व्हचा समावेश आहे. या सर्व कामांमध्ये ठेकेदार नियमाप्रमाणे काम करत नसून, कामाचा दर्जा निकृष्ट असल्याने काम बंद पाडले असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

नागझरीत एका रात्रीत बीयरची तीन दुकाने फोडली

अल्पवयीन मुलांचा सहभाग असल्याचा व्हिडीओ सीसीटीव्हीत

■ **बोईसर** : मनोर पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या नागझरी, लालोंडे येथील तीन बिअर शॉपीची दुकाने अनोळखी चोरट्यांनी फोडली. या प्रकार रविवारी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. यात तीन अल्पवयीन मुलांचा सहभाग असल्याचे दिसून येत आहे. रविवारी मध्यरात्री नागझरी किराट रस्त्यालगतच्या धीरज शॉपीचे पत्रे तोडून चोरट्यांनी किरकोळ रकमेसह पोबारा केला. तर लालोंडे बस स्टॉप आणि नागझरी नाका येथील शॉपीमधून काही रकमेसह

दारूवर चोरट्यांनी डल्ला मारला. यापूर्वीही चोरट्यांनी वाहनांच्या बॅटरी चोरी, ट्रॅक्टर चोरांनी धुमाकूळ माजवला होता. मात्र आजतागायत चोरट्यांना पकडण्यात पोलिसांना यश आले नसल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.

या घटनेची प्रत्यक्ष पाहणी मनोर पोलिसांकडून करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक शिंदे यांनी सीसीटीव्ही फुटेज पाहून तीन अनोळखी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

> रात्रीच्या वेळी नागझरी नाका येथे कायम पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती करणे गरजेचे आहे. भुरट्या चोरांसह या भागांत गुरे चोरणाऱ्या टोळ्यादेखील सहभागी झाल्या आहेत. कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येणारी नाही. तसेच रात्रीच्या वेळी गस्तीच्या फेऱ्यांत वाढ करण्यात यावी.
>
> – **अभिजित अधिकारी**, उपप्रभाग प्रमुख बोईसर

चायनीज सेंटर्सना बेकायदा वीज, नळजोडणी

■ **घणसोली** : शहरातील विविध भागात बेकायदा चायनीज खाद्यपदार्थ केंद्रांचे पेव फुटले आहे. यातील बहुतांश केंद्र नागरी वस्तीपासून दूर असलेल्या ठिकाणी सुरू आहेत. परंतु या बेकायदा केंद्रांना वीज व पाणी जोडणी बिनदिक्कत मिळत आहे. त्यामुळे नवी मुंबईकरांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. नागरी वस्तीपासून दूरवर असलेल्या झाडीत, वनराई, कांदळवन क्षेत्रात, उच्च दाबाच्या वीजवाहिन्यांखाली बेकायदा चायनीज केंद्र थाटण्यात आली आहेत. या केंद्रांनी नियमांना फाटा देत पाणी व विद्युत जोडणी घेतली आहे. एकवेळ रहदारीच्या ठिकाणी नळजोडणी घेताना नागरिकांना अडचणी येतात. परंतु या ठिकाणी मात्र बिनधास्तपणे पाण्याचा वापर केला जात आहे. तसेच विद्युत जोडणीचा अर्ज भरताना शेजारील एखाद्या ग्राहकाचा मीटर क्रमांक दिला जातो. परंतु नागरी वस्तीपासून दूरवर असलेले बहुतांशी चायनीज सेंटरवाले तसे न करता अनधिकृतरीत्या विद्युत जोडणी घेत आहेत.

> बेकायदा चायनीज सेंटरमध्ये घेण्यात आलेल्या नळ जोडण्यांसंदर्भात माहिती घेतली जाईल. तसेच संबंधितांवर कारवाई केली जाईल.
>
> –**अरविंद शिंदे**, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा.

> विभागानुसार कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना या संबंधी चौकशी करण्यास सांगितली जाईल. त्या अनुषंगाने दोषी आढळलेल्या चायनीज सेंटरवर कारवाईचा बडगा उगारला जाईल.
>
> –**रघुनाथ गोफणे**, कार्यकारी अभियंता, महावितरण.

Mumbai Police register FIR on Vidya Balan's complaint of impersonation and fraud on Instagram

Mumbai: Mumbai Police has registered a case after Bollywood actor Vidya Balan complained that someone was impersonating her using a fake Instagram account and email id and cheating people from the film industry. Quoting the first information report (FIR) report registered at the Khar police station on Monday, newswire PTI reported that the crime came to light on January 16 when a stylist associated with movies received a WhatsApp message from an unidentified number. The message claimed that the sender was Vidya Balan who wanted to discuss work with him, the PTI report said. Since the stylist had the actor's contact details, he suspected something was not right about the message from an unknown number. He then informed Vidya Balan about the message, the official said.

Between January 17 and 19, the actor learnt that someone had created a fake Instagram profile and a bogus email id claiming that it belonged to her and unidentified persons were using them to contact people from the film industry and others to "discuss work", the official said. Alarmed by the attempt to cheat others using her name, the actor asked her manager to approach the Khar police station. Accordingly, a written complaint was submitted on January 20, said the FIR. On Monday (February 19), the actor also lodged a complaint, resulting in the FIR for identity theft under Section 66 (c) of the IT Act, said the official, adding that a probe was underway. Meanwhile, on February 15, Malwani Police in Mumbai arrested two persons for deceiving an actor allegedly under the guise of stock market share transactions. Both suspects received fraudulent funds into their accounts, the police said. The duo was identified as Saadhan Khillare and Pandurang Hiparkar, an official said on Thursday. The victim, Niraj Singh (33) an actor from the Hindi TV serial, stumbled upon an account on Facebook last year, leading him to a link that added him to a WhatsApp group. In the group, members shared screenshots purportedly showcasing lucrative stock market transactions. A caller, posing as the group's admin, falsely claimed that investments could yield a 300 per cent return, the official said.

Jurist Fali S Nariman was part of landmark cases in career spanning over seven decades

New Delhi: Distinguished jurist and eminent lawyer Fali S Nariman, who breathed his last on Wednesday aged 95, was part of historic judicial proceedings like in the Golaknath case and the Kesavananda Bharati case where the Supreme Court delivered path-breaking judgements that protected the rights of citizens and prevented Indian democracy from going adrift. Following are some of the notable cases of which Nariman was part as a counsel or senior lawyer during his illustrious career spanning over seven decades: *The Golaknath case of 1967: The Supreme Court held that Parliament cannot make a law which is capable of infringing the fundamental rights of citizens. Nariman appeared for an intervenor supporting the petitioners seeking preservation of fundamental rights. *The Kesavananda Bharati case: Nariman assisted noted advocate Nanabhoy Palkhivala in the famous case that led to the path-breaking judgement which laid down the "basic structure doctrine" of the Constitution, clipping Parliament's power to amend the Constitution. The 1973 verdict simultaneously gave the judiciary the authority to review any constitutional amendment on grounds of violation of the basic structure of the Constitution.

Federal Bank Kochi Marathon 2024: Establishing Itself as a Premier Sporting Brand

MUMBAI: The Federal Bank Kochi Marathon, now in its second edition, has firmly cemented its status as a premier sporting event, attracting top athletes from across the country. Organized by CleoSportz, this marathon has become a platform for both professional athletes and amateur runners to showcase their talent and endurance. In the latest edition of the marathon, held in Kochi, Maharashtra's Harshad Mhatre emerged victorious in a thrilling finish, clocking an impressive time of 02:35:50 hours. The intensity of the competition was palpable as Dinesh Kisan Patil, also hailing from Maharashtra, finished just behind him with an identical timing. Telangana's Ramavath Ramesh Chandra secured the third position, highlighting the diverse pool of talent that the marathon attracts.

महिलेचे दोन लाख रुपये लंपास

■ **नवीन पनवेल** : प्लास्टिकच्या थैलीत ठेवलेले दोन लाख रुपये मोटरसायकलवरून आलेल्या चोरट्यांनी चोरून नेले. तळोजा से. ११ येथील ३२ वर्षीय फायका मालगुंदकर या १५ फेब्रुवारीला पैसे काढण्यासाठी बँकेत गेल्या होत्या. त्यांनी खात्यावरून दोन लाख रुपये काढले व ते पैसे प्लास्टिकच्या थैलीमध्ये ठेवले. त्यानंतर त्या बँकेच्या बाहेर पडल्या. यावेळी त्या घराकडे जात असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या हातातील पैसे असलेली थैली खेचून ते पळून गेले.

अपघातातील जखमी महिलेचा मृत्यू

■ **कर्जत** : कर्जत-नेरळ रस्त्यावर सोमवारी पहाटे दुधाच्या टेम्पोने पादचारी महिलांना धडक दिली होती. या अपघातात एक जैन साध्वी व एक जैन महिलेचा जागीच मृत्यू झाला होता. तर तिसरी जैन भगिनी गंभीर जखमी झाली होती. या महिलेला मंगळवारी मृत्यू झाला. सोमवारी पहाटेच्या सुमारास खोपोलीहून कर्जतला आलेल्या चार जैन साध्वी व त्यांच्या बरोबर असलेल्या जैन महिला कर्जतहून नेरळकडे जात असताना मागून येणाऱ्या सुसाट दुधाच्या टेम्पोने त्यांनी धडक दिली. होती. या घटनेत टेम्पोने तिघींना अक्षरशः चिरडले. यामध्ये एक जैन साध्वी सह दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला.

रोह्यात बंद घरावर चोरट्यांचा डल्ला

■ **रोहा** : पुतण्याच्या घरी हळदीच्या कार्यक्रमात सारे घरातील गेल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी या घरावर डल्ला मारत लाखो रुपयांचे दागिने व रोडक चोरुन नेल्याची घटना रोहा तालुक्यातील उडदवणे गावात घडली. या घटनेमुळे तालुक्यातील ग्रामीण भागात घबराटीचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी रात्रीच्या वेळी गस्त वाढवावी, अशी मागणी जनतेतून होत आहे.

उडदवणे गावातील संतोष महादेव गायकर हे त्यांचा पुतण्याच्या घरी शनिवारी रात्री हळदीच्या कार्यक्रमाला सहकुटुंब गेले होते. ही संधी साधत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराच्या हॉलमधील स्लायडिंगच्या काचा उचकटून घरात शिरले व कपाटातील लॉकर तोडून त्यातील सोन्याचा हार, गंठण, सोन्याची पाने, सोन्याच्या वाळ्यांची जोड व चांदीचे दागिने व रोकड असा एकूण १ लाख ६० हजारांचा ऐवज चोरून नेला. या घटनेची माहिती मिळताच रोहा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घटनेचा पंचनामा केला. संतोष गायकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या घटनेचा तपास रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. संदीप ऐदळे करत आहेत.

मेट्रोचे भंगार चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना बेड्या

■ **मुंबई** : पोर्टर नावाच्या ॲपच्या माध्यमातून माल वाहतूक करणारे वाहन बुकिंग करून त्याच्या मदतीने मेट्रोचे भंगार चोरी करणाऱ्या पोलीस अभिलेखवरील गुन्हेगारांना ट्रॉम्बे पोलिसांनी गजाआड केले. वाहीद खान, शबर शेख, वसीमउल्ला खान, शिवा मंटळ आणि राशिद कुरेशी अशी अटक आरोपींची नावे आहेत. या आरोपींकडून पोलिसांनी चोरीचा माल आणि वाहन असा एकूण १७ लाख ८६ हजार ८० रुपये किमतीचा ऐवज हस्तगत केला. मानखुर्द, महाराष्ट्र नगर परिसरातील खंडोबा मंदिराजवळ सुरू असलेल्या मेट्रोच्या कामासाठी आणण्यात आलेले लोखंडी क्रिप्स आणि अन्य साहित्य असा एकूण २ लाख ८६ हजार ८० हजार रुपये किमतीचा १ हजार ५६८ किलो वजनाचा ऐवज १३ फेब्रुवारीच्या रात्री चोरी करण्यात आला. येथे काम करत असलेल्या गजेंद्र कदम (२७) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून ट्रॉम्बे पोलिसांनी तपास सुरू केला. खबऱ्यांच्या नेटवर्कच्या आधारे पोलिसांनी केलेल्या तपासात चोरीचे सामान घेऊन एक टेम्पो योगायतन जेटीकडे जाणाऱ्या कच्च्या रोडने गेल्याची महत्त्वपूर्ण माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी चौघांना ताब्यात घेऊन अटक केली. आरोपींनी गुन्ह्यात वापरलेला आयशर ट्रक पोर्टर ॲपच्या माध्यमातून बुक करण्यात आला होता. वाहतूक करण्यात येणारा माल चोरीचा असल्याचा संशय आल्याने आयशर चालकाने मालवाहतूक करण्यास नकार दिला. आरोपींनी चालकाला दुप्पट भाडे देण्याचे आमिष दिल्याने तो माल वाहतूक करण्यास तयार झाल्याचे पोलीस तपासात समोर आले. त्यानंतर पोलिसांनी ट्रक बुक करणाऱ्या शिवा मंटळ याला ताब्यात घेत अटक केली. पोलिसांनी केलेल्या पुढील तपासात आरोपी शिवा याने महाराष्ट्र नगर, मानखुर्द ते मंडाळा, मानखुर्द असा पिकअप पॉइंट आणि ड्रॉपिंग पॉइंट अशी वाहने बुकिंग केल्याचे समोर आले. पोलिसांनी माल वाहतूक करणाऱ्या काही चालकांकडे चौकशी केली असता, सर्वांनी लोखंड भंगार वाहतूक केल्याचे सांगितले. पोलिसांनी शिवाकडे कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली देत माल भंगार व्यावसायिकाला विकल्याचे सांगितले. पोलिसांनी माल खरेदी करणाऱ्याला अटक करून त्यांच्या जवळून चोरीचे ७६८ किलो लोखंडी साहित्य जप्त केले.

■ गोवंडीतील रहिवासी आरोपी वाहीद खानविरोधात ९ तर, मानखुर्दमधील रहिवासी आरोपी शबर शेख विरोधात ६, मानखुर्दमधील आरोपी शिवा बसवराज मंटळविरोधात ४ गुन्हे आणि कुर्ल्यातील रहिवासी आरोपी वसीमउल्ला खान विरोधात एक गुन्हा दाखल आहे.

भिवंडीत साडेतीन कोटींचा गुटखा जप्त : तिघांना अटक

■ **भिवंडी** : महाराष्ट्रात गुटखा विक्रीसाठी प्रतिबंधीत करण्यात आला आहे. असे असतानाही भिवंडी शहर परिसरात मोठ्या प्रमाणात गुटख्याची वाहतूक करून विक्री सुरू आहे. याबाबत ठाणे ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी मुंबई-नाशिक महामार्गावरील येवई गावाजवळील धाब्याजवळ सापळा रचून केलेल्या धडक कारवाईत तीन मालवाहू कंटेनरमधून एकूण सुमारे साडेतीन कोटी रुपये किमतीचा आणला जात असलेला गुटखा जप्त केला आणि तिघांना अटक केली.

ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांनी महामार्गावरून होणाऱ्या गुटखा तस्करीवर पाळत ठेवण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे गुन्हे शाखेचे

पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांच्या नेतृत्वाखालील सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, पोलीस हवालदार उमेश ठाकरे, हनुमंत गायकर, भगवान सोनावणे, सुहास सोनावणे, हेमंत विभुते, धनाजी कडव, संतोष सुर्वे,पोलीस नाईक जितेंद्र वारके,योगेश शेळकंदे,स्वप्नील बोडके यांना नाशिक मुंबई महामार्गा वरून गुटखा व प्रतिबंधित तंबाखू यांची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाल्याने त्यांनी मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडीजवळील येवई गावाच्या हद्दीतील शामियाना धाब्याचे समोरील रस्त्यावर कांती मोटार्स या दुकानाच्या समोर सापळा रचला. संशयित तीन कंटेनर उभे असलेले आढळून आले. या कंटेनरची तपासणी केली असता, त्यामध्ये मानवी आरोग्यास अपायकारक व प्रतिबंधित सुमारे ३ कोटी ५५ लाख १४ हजार ३१० रुपये किमतीचा जाफरानी जर्दा तंबाखू, गुटखाचा मुद्देमाल आढळून आला. त्यामुळे पोलीस पथकाने या कंटेनरवरील ताहीर सिताब खान, मोहम तारीफ हबीब खान, जाहुल यासीन हक (सर्व, रा. राजस्थान) यांना ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात भिवंडी तालुका पोलीस ठाणे येथे विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करून तिन्ही चालकांना अटक केली.

राज्य राखीव पोलीस दलातील हवालदार गोळी लागून जखमी

आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा संशय

■ **मुंबई** : राज्य राखीव पोलीस दलात कार्यरत असलेले हवालदार व्यंकट मारुती पडळवार (४०) हे हातातील रायफलमधून गोळी झाडली जाऊन जखमी झाल्याची घटना सोमवारी मालाडमध्ये घडली. त्यांच्यावर कांदिवलीतील शताब्दी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आजारपणामुळे आलेल्या नैराश्यातून त्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे बोलले जाते. मालाड पोलीस अधिक तपास करत आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील रहिवाशी असलेल्या पडळवार यांना मालाड रेल्वे स्थानकाजवळील द मॉलजवळ सोमवारी ड्युटी देण्यात आली होती. हातातील एलएलआयमधून गोळी झाडली जाऊन ते जखमी झाले. ही गोळी त्यांच्या हातातून आरपार होऊन ते गंभीर जखमी झाले. याची माहिती मिळताच मालाड पोलीस ठाण्याचे वपोनि. रवी आडाणे यांच्यासह पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेत जखमी अवस्थेतील पडळवार यांना उपचारांसाठी कांदिवलीतील शताब्दी रुग्णालयात दाखल केले. मालाड पोलिसांनी या प्रकरणी अपघाती घटनेची नोंद करून तपास सुरू केला. यात पडळवार हे गेल्या तीन वर्षांपासून सिजोफेनिक आजाराने ग्रस्त आहेत. यामुळे त्यांना कायम नकारात्मक विचार येत होते. या आजाराला कंटाळून त्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे बोलले जाते. मात्र, उपचारांनंतर पडळवार यांचा जबाब नोंदवल्यानंतर याचा खुलासा होईल, असे पोलिसांनी सांगितले.

गहाण ठेवलेले दागिने घेऊन सराफ पळाला

■ **मुंबई** : गहाण ठेवलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ३१ लाखांचा ऐवज लंपास करून ॲन्टॉप हिलमधील सराफाने पळ काढल्याचा प्रकार समोर आला आहे. सोमाराम पटेल असे सराफाचे नाव असून, त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून ॲन्टॉप हिल पोलीस अधिक तपास करत आहेत. येथील मोतीलाल नेहरूनगरमध्ये राहात असलेल्या कालीमाराज देवेंद्र या भाजी विक्रीचा व्यवसाय करतात. या व्यवसायाच्या बचतीमधून त्यांनी काही प्रमाणात सोने खरेदी केले होते. कोरोना काळात आर्थिक स्थिती बिघडल्यामुळे जानेवारी २०२२ मध्ये कालीमाराज यांनी त्यांच्या जवळील पाच तोळे सोने येथील सत्यम ज्वेलर्सचा मालक सोमाराम पटेल याच्याकडे गहाण ठेऊन प्रति महिना २ टक्के

व्याजाने २४ हजार घेतले. कालीमाराज या नियमित व्याजाची रक्कम भरत होत्या. गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात त्यांनी घेतलेले २४ हजार रुपये पटेल याला परत करून गहाण ठेवलेले सोने परत मागितले. सोने आज देतो, उद्या देतो, असे सांगून तो टाळाटाळ करू लागला. २८ नोव्हेंबरला पटेल आपले दुकान बंद करून पसार झाला. त्यानंतर मात्र, आपली फसवणूक झाल्याची कालीमाराज यांची खात्री पटली. कालीमाराज यांच्या प्रमाणेच पटेल याने आणखी काही जणांचे गहाण ठेवलेले दागिने आणि रक्कम सोबत नेली होती. पटेलने १० जणांचे १८ लाख ९३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि तिघांची १२ लाख २० हजार रुपयांची रक्कम असा एकूण ३१ लाख १३ हजार रुपयांचा ऐवज घेऊन पोबारा केला होता. अखेर कालीमाराज यांनी गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस ॲन्टॉप हिल पोलीस ठाणे गाठून एक लाख ६२ हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या अपहाराची तक्रार दिली. पटेल याने कालीमाराज यांच्यासह एकूण १३ जणांची ३१ लाख १३ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात समोर आल्यानंतर पोलिसांनी आरोपी पटेलविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

२५ कोटींची खंडणी मागणाऱ्या महिलेविरोधात गुन्हा

■ **मुंबई** : अंधेरीतील एका ५८ वर्षीय हॉटेल व्यावसायिकाकडे पर्सनल सेक्रेटरीचा जॉब मिळवण्याच्या बहाण्याने जवळीक साधत एका तरुणीने त्यांना चहातून गुंगीचे औषध देत शारीरिक संबंध ठेवत आधी १५ लाख रुपये उकळले. मग, शारीरिक संबंधांचा व्हिडीओ काढून त्याआधारे २५ कोटींची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आला. या प्रकरणी तरुणीविरोधात गुन्हा दाखल करून अंबोली पोलीस अधिक तपास करत आहेत.

हॉटेल व्यावसायिकाने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, यातील ३५ वर्षीय तरुणीने गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात त्यांच्याकडे पर्सनल सेक्रेटरीचा जॉब मिळवण्याच्या बहाण्याने संपर्क साधत ओळख वाढवली. पुढे तिने या व्यावसायिकाशी जवळीक वाढवत १५ लाख रुपये उकळले. त्यानंतर, या तरुणीने २३ जानेवारीला त्यांना चहा पिण्याच्या बहाण्याने घरी बोलावून घेत त्यांच्या चहामध्ये गुंगीचे औषध टाकले. त्यानंतर तरुणीने या हॉटेल व्यवसायिकासोबत शारीरिक संबंध ठेवत त्याचे मोबाईलमध्ये व्हिडीओ रेकॉर्डिंग केले.

शारीरिक संबंधांचा व्हिडीओ नातेवाईकांना दाखवण्याची आणि सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तिने २५ कोटीच्या खंडणीची मागणी केली. १५ दिवसांत पैसे दिले नाहीत तर जीवे ठार मारण्याची आणि बलात्काराची खोटी तक्रार करून अडकवण्याची धमकी दिल्याची तक्रार हॉटेल व्यवसायिकाने अंबोली पोलिसांत दिली.

भिवंडीत माजी नगराध्यक्षांच्या घरावर सशस्त्र दरोडा

२१ लाखांचे सोन्याचे दागिने लुटले

■ **भिवंडी** : शहरातील ताडाळी या गावात राहणाऱ्या नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षांच्या घरात मध्यरात्रीच्या सुमारास सशस्त्र शिरलेल्या तिघा दरोडेखोरांनी सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २१ लाख १५ हजारांचा ऐवज लुटला. या दरोड्याने परिसरात खळबळ माजली आहे.

भिवंडी शहरातील जुनी ताडाळी या ठिकाणी शंकर निवास हा बंगला असून, पहिल्या मजल्यावर माजी नगराध्यक्षा साधना लहू चौधरी कुटुंबासोबत राहतात. मध्यरात्री त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे लँच लॉक तोडून घरात शिरलेल्या तिघा अज्ञात दरोडेखोरांनी चौधरी यांना धमकी देत त्यांच्या हातातील सोन्याच्या बांगड्या, बेडरूममधील लाकडी कपाटाच्या लॉकरमधील ५० तोळे वजनाचे विविध वर्णनाचे सोन्याचे दागिने व ९५ हजार रुपये असा एकूण २१ लाख १५ हजारांचा मुद्देमाल चोरी करून पळून गेले. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, साधना चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीवरून नारपोली पोलीस ठाण्यात जबरी दरोडाप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पार्टटाईम जॉब देण्याच्या बहाण्याने महिलेला घातला लाखोंचा गंडा

■ **नवी मुंबई** : पार्टटाईम जॉब देण्याच्या बहाण्याने एका सायबर टोळीने नवीन पनवेल भागात राहणाऱ्या एका महिलेला टास्क पूर्ण करण्याच्या बहाण्याने तब्बल १२ लाख १६ हजार ४०० रुपये गुंतवणूक करण्यास भाग पाडून तिची ऑनलाईन फसवणूक केल्याचे उघडकीस आले. नवी मुंबई सायबर पोलिसांनी या सायबर टोळीविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून या टोळीचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली ३० वर्षीय महिला नवीन पनवेल भागात राहण्यास असून, गत ५ जानेवारी रोजी एका सायबर टोळीने या महिलेच्या व्हॉट्सॲपवर

पार्टटाईम जॉबबाबत मेसेज पाठवला होता. या महिलेने पार्टटाईम जॉब करण्यास इच्छुक असल्याचे सांगितल्यानंतर सायबर टोळीने या महिलेला दोन लिंक पाठवून देत दोन रेस्टॉरंटला रेटिंग करण्याचा जॉब दिला. या महिलेने सदर हॉटेलचे रेटिंग करून सायबर चोरट्यांना स्क्रिनशॉट्स पाठवून दिल्यानंतर सायबर चोरट्यांनी तिला टेलिग्रॅम ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. या महिलेने टेलिग्राम डाऊनलोड केल्यानंतर सायबर टोळीने तिच्याकडून टेलिग्रामद्वारे वैयक्तिक माहिती व बँक खात्याची माहिती मागून घेतली. तिला पुढील टास्क पूर्ण करण्यासाठी एका लिंकद्वारे टेलिग्रामच्या ग्रुपवर जॉइन करण्यात आले. त्यांनतर पहिला टास्क पूर्ण केल्यानंतर सायबर टोळीने तिच्या बँक खात्यावर १५० रुपये पाठवून दिले. तसेच अशा पद्धतीने एकूण २२ टास्क पूर्ण करावे लागतील, असे या महिलेला सायबर टोळीकडून सांगण्यात आले. त्यानंतर या महिलेने २२ टास्कपैकी ७ टास्क पूर्ण केल्यानंतर तिला सर्व २२ टास्क पूर्ण करावे लागतील, असे सांगण्यात आले. त्यानंतर या महिलेला पुढील टास्क पूर्ण करण्यासाठी १ हजार रुपये रक्कम पाठवण्यास सांगण्यात आले. रक्कम पाठवल्यानंतर या महिलेच्या खात्यात १३०० रुपये पाठवून सायबर टोळीने तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर पुढील टास्क पूर्ण करण्यासाठी तिला आणखी ३ हजार रुपये पाठवण्यास सांगण्यात आले असता, सदर रक्कमसुद्धा या महिलेने पाठवून दिली.

अशा पद्धतीने या टोळीने टास्क पूर्ण करण्याच्या बहाण्याने या महिलेला वेगवेगळी रक्कम पाठवण्यास सांगून तिला होणारा नफा दर्शवून वेगवेगळ्या बँक खात्यावर पैसे पाठवण्यास भाग पाडले. अशा पद्धतीने या महिलेने १२ लाख १६ हजार ४०० रुपये रक्कम पाठवल्यानंतर या महिलेला नफा म्हणून २९ लाख रुपये मिळणार असे दाखवण्यात आले. त्यानंतर या महिलेने २९ लाख रुपये मिळण्याकरीता सायबर टोळीला विनंती केली असता, त्यांनी सदर रक्कम मिळवण्यासाठी पुन्हा टास्क पूर्ण करावे लागतील, असे सांगितले. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे या महिलेला लक्षात आले. त्यानंतर तिने प्रथम एनसीसीआरपी पोर्टलवर ऑनलाईन तक्रार दाखल करून नवी मुंबई पोलीस सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

निवासी डॉक्टर राज्यव्यापी संपावर ठाम, गुरुवारी सायंकाळी ५ वाजल्यापासून जाणार संपावर

■ **मुंबई** : आपल्या विविध मागण्यांसाठी सरकारकडून वारंवार केवळ आश्वासनेच मिळत असून, त्यावर ठोस कार्यवाही होत नाही. त्यामुळे निवासी डॉक्टरांची संघटना असलेल्या ह्यमार्डह्नने गुरूवारी सायंकाळी ५ वाजल्यापासून राज्यव्यापी संप पुकारण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र या संपामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालातील निवासी डॉक्टर सहभागी होणार नसल्याचे बीएमसी मार्डकडून स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयामधील डॉक्टरांची संख्या वाढत आहे. मात्र त्या तुलनेत वसतिगृहांच्या संख्येत वाढ करण्यात आलेली नाही, तसेच वसतिगृहाची दूरवस्था झाली असून तेथे सोयी- सुविधांचा अभाव आहे. यामुळे वसतिगृहांची तातडीने दुरुस्ती करावी आणि बांधकामासाठी निधी उपलब्ध करावा. तसेच निवासी डॉक्टरांचे प्रलंबित मानधन तात्काळ द्यावे, त्यांना विद्यावेतन वेळेवर द्यावे, विद्यावेतनामध्ये १० हजार रुपयांपर्यंत वाढ करावी आदी मागणीसाठी केंद्रीय मार्डने ७ फेब्रुवारीपासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा दिला होता. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार

यांनी मार्डच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या मान्य करण्यात येतील, असे आश्वासन दिल्याने संप मागे घेण्यात आला होता. मात्र दोन आठवडे उलटले तरी त्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी मार्डने मागण्यांबाबत पाठपुरावा करून संपाचा इशारा दिला. मात्र कोणताही तोडगा न निघाल्याने केंद्रीय मार्डने २२ फेब्रुवारी सायंकाळी ५ वाजल्यापासून अनिश्चित काळासाठी राज्यव्यापी संप पुकारण्याचा निर्णय जाहीर केला असल्याची माहिती केंद्रीय मार्डचे अध्यक्ष डॉ. अभिजीत हेलगे यांनी दिली.

मुंबई महानगरपालिकेतील डॉक्टरांचा सहभाग नाही

मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या केईएम, नायर, शीव व कूपर या वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांतील निवासी डॉक्टरांनी मार्डच्या संपामध्ये सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मुंबईतील पाचपैकी चार वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील आरोग्य सेवा अखंडित सुरू ठेवण्यात येणार असल्याचे बीएमसी ह्यमार्डह्नचे अध्यक्ष वर्धमान रोठे यांनी सांगितले. मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमधील आरोग्य सेवा सुरळीत राहणार असल्याने मुंबईतील रुग्णांना त्रास होणार नाही, असे डॉक्टरांनी सांगितले.

खांदेश्वरमध्ये जप्त गाड्यांना लागली आग

■ **नवीन पनवेल** : खांदेश्वर पोलिसांनी मुद्देमालात जप्त केलेल्या गाड्यांना आग लागल्याची घटना घडली. यात दोन गाड्या जळून खाक झाल्या आहेत. खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ही घटना आहे. खांदेश्वर पोलिसांनी विविध गुन्ह्यात जप्त करून ठेवलेल्या गाड्यांना सायंकाळी आग लागल्याची घटना घडली. ही आग दुपारी ५ वाजून १५ मिनिटांनी लागल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. ही आग लागल्याची माहिती खांदेश्वर पोलीस, सिडको तसेच पालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठे नुकसान टळले आहे. या

आगीत खाजगी बस व डंपर जळाले आहेत. मात्र कोणतीही जीवितहानी झाली नाही. वाहनांचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. अज्ञात व्यक्तीने फेकलेल्या सिगारेटच्या थोटकामुळे ही आग लागली असल्याचे बोलले जात आहे.

गाय, बैलासह दोन कालवडांची सुटका : एकास अटक

■ **कर्जत** : अवैधरीत्या गुरांची वाहतूक करणारा टेम्पो नेरळ पोलिसांनी चिकनपाडा येथे पकडून त्यातील गाय, बैल व दोन कालवड अशा चार गुरांची सुटका केली. या प्रकरणात पोलिसांनी एकाला अटक केली आहे.

चिकनपाडा साळोख रोडने जाणाऱ्या मिनी टेम्पोमधून अवैधरीत्या गुरांची वाहतूक होत असल्याचा संशय नेरळ पोलिसांना आल्याने येथे कर्तृत्वावर असलेले

नेरळ पोलिसांनी पकडला गुरांनी भरलेला टेम्पो

सहाय्यक फौजदार श्रीरंग किसवे यांनी टेम्पोचा पाठलाग करून टेम्पोची तपासणी करायची असल्याचे सांगून हा टेम्पो थांबवला. त्यावर टेम्पो चालक व त्याचा सहकारी या दोघांनी पोलिसांना चकवा देत येथून पळ काढला. दरम्यान, पोलिसांनी टेम्पोची पाहणी केली असता, त्यामध्ये तांबड्या रंगाची आखूड शिंगांची गाय, काळ्या रंगाचा आखूड शिगाचा बैल व दोन कालवडी अशी चार गुरे टेम्पोत भरलेली त्यांना आढळली. त्यावर किसवे यांनी ही माहिती नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांना सांगताच ते घटनास्थळी हजर झाले व त्यांनी पाहणी केली. या वेळी बोलताना ढवळे यांनी चोरट्यांनी ही गुरे कुठून तरी चोरुन आणली असावीत व त्यांची चारा पाण्याची व्यवस्था न करता ती टेम्पोत भरून कत्तलीसाठी नेत असावेत, असे सांगितले. त्यावर फरार टेम्पो चालक व त्याचा सहकारी या दोघांविरोधात नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. या घटनेचा तपास करत पोलिसांनी यातील एकाला ताब्यात घेतले आहे, तर दुसऱ्याचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच सुटका करण्यात आलेल्या चारही गुरांना नेरळ येथील गोशाळा येथे रात्री सोडण्यात आले असून मिनी टेम्पो पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

दरम्यान, किसवे यांच्या कामगिरीचे या भागातील शेतकरी व नागरिकांकडून कौतुक केले जात आहे. या कारवाईमुळे गुरे चोरणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, या प्रकरणाचा पुढील तपास शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनखाली पोलीस उपनिरीक्षक लोंढे करत आहेत.